रायगड, नवी मुंबई
वर्ष १७ • अंक १८
www.ramprahar.com
# राम प्रहर
रविवार, ४ ऑगस्ट २०२४ • पाने ८ • किंमत ₹ २

केदारनाथ अतिवृष्टीत रायगडातील आठ पर्यटक सुखरूप/२
दरडग्रस्त माडभुवनवाडीचे लवकरच होणार पुनर्वसन/३
पनवेलचे प्रशासकीय भवन ऑगस्टअखेर सेवेत/६

# आज विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार महाशिबिर

## खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात सेवाभावी उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अखंडपणे समाजोपयोगी उपक्रम राबविणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल, भारतीय जनता पक्ष, रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन आणि साधू वासवानी मिशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने १६वे विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार महाशिबिर रविवारी (दि. ४) होणार आहे.

खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी ९ वाजता या शिबिराला सुरुवात होईल. या वेळी होणाऱ्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून आमदार रविशेठ पाटील, आमदार महेश बालदी, माजी आमदार व भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तर प्रमुख मान्यवर म्हणून एमजीएम मेडिकल कॉलेज हॉस्पिटलचे डीन डॉ. जी.एस. नरशेट्टी, नामवंत शल्यचिकित्सक डॉ. गिरीष गुणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या महाशिबिरात सर्वसाधारण रोग तपासणी, बालरोग तपासणी, महिलांचे आजार, त्वचारोग तपासणी, हृदयरोग तपासणी, दंतरोग तपासणी, मधुमेह तपासणी, नाक, नाक व घसा तपासणी, हाडांचे रोग तपासणी, कर्करोग तपासणी, क्षयरोग तपासणी, होमिओपॅथिक तपासणी, आयुर्वेदिक तपासणी, सर्व प्रकारच्या रक्त तपासणी तसेच नेत्र तपासणी व चष्मेवाटप, कृत्रिम हात व पाय बसविणे अशा विविध आरोग्य तपासण्यांसह, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला व औषधोपचार देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर आयुष्यमान भारत डिजिटल कार्ड तयार करून देण्यात येणार असून महात्मा फुले योजनेंतर्गत आधारकार्डला लिंक करून देण्याचीही सुविधा या ठिकाणी असणार आहे. या वेळी दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार असून अवयदानाचे फॉर्म भरण्याची सुविधादेखील उपलब्ध असणार आहे.

या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले, भाजपचे पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत यांनी केले आहे.

# भव्य रोजगार मेळाव्यात १८२८ उमेदवारांचा सहभाग

## आयुष्य घडविण्यासाठी संकल्प महत्त्वाचा -अविनाश धर्माधिकारी





(अधिक छायाचित्रे पान ६ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयुष्य घडविण्यासाठी संकल्प महत्त्वपूर्ण असतो. त्यामुळे स्वतःची ओळख, आवडते क्षेत्र आणि उत्तम व प्रतिभावंत होणे ही त्रिसूत्री अंगीकारा, अशी मार्गदर्शक सूचना माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांनी शनिवारी (दि. ३) खांदा कॉलनी येथे विद्यार्थ्यांना केली.

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ५०व्या वाढदिवसानिमित्त खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर उच्च महाविद्यालयात सी.डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन सत्र व संवाद कार्यक्रम; त्याचबरोबर पाचवी ते पदवीधर उमेदवारांना रोजगाराच्या दृष्टिकोनातून भव्य रोजगार मेळावा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्या वेळी धर्माधिकारी बोलत होते. या मेळाव्यात १८२८ उमेदवारांनी सहभाग घेतला.

या वेळी प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, (पान २ वर..)




सस्नेह निमंत्रण

आपणास कळविण्यात येते कि, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, भारतीय जनता पार्टी पनवेल, रायगड मेडिकल असोसिएशन आणि साधू वासवानी मिशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विनामूल्य आरोग्य तपासणी आणि मोफत औषधोपचार शिबीराचे आयोजन रविवार, दिनांक ०४ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९:०० ते दुपारी ४.०० वाजेपर्यंत करण्यात आलेले आहे.

कार्यकमाचे अध्यक्ष

लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर (माजी खासदार)

प्रमुख उपस्थिती

मा. श्री. रविशेठ पाटील
आमदार, पेण विधानसभा

मा. श्री. महेशजी बालदी
आमदार, उरण विधानसभा

मा. श्री. धैर्यशील पाटील
माजी आमदार व
अध्यक्ष, दक्षिण रायगड जिल्हा भाजपा

मा. श्री. अविनाशजी कोळी
अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भाजपा

प्रमुख मान्यवर

मा. डॉ. जी. एस. नरशेट्टी
डीन,
एम.जी.एम. मेडिकल कॉलेज हॉस्पिटल कामोठे

मा. डॉ. गिरीष गुणे
पनवेल मधील नामवंत
शल्य चिकित्सक

स्थळ : सी.के.टी. महाविद्यालय, खांदा कॉलनी, नविन पनवेल.

तरी सर्व लोक प्रतिनिधी, भाजपा पदाधिकारी, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते यांनी गरीब व गरजू लाभार्थींना सोबत घेऊन आपल्या सहकाऱ्यांसह वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

आपले नम्र

अरुणशेठ भगत
अध्यक्ष
पनवेल तालुका भाजपा

अनिल भगत
अध्यक्ष
पनवेल शहर भाजपा

डॉ. निशिगंध आठवले
अध्यक्ष
रायगड मेडिकल असोसिएशन

परेश ठाकूर
सचिव

आमदार प्रशांत ठाकूर
अध्यक्ष
श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल
व सर्व नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, पनवेल तालुका व शहर भारतीय जनता पार्टी




# खोट्या लोकांना जागा दाखवा

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कार्यकर्त्यांना सूचना

**अमरावती : प्रतिनिधी**

जनता आपल्या पाठीशी आहे. त्यामुळे या खोट्या लोकांना त्यांची जागा दाखवा, असा सल्ला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना दिला. ते अमरावती येथे बोलत होते.



राज्यात आज पुन्हा नव्या दमानं मैदानात उतरण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. आजचा दिवस तुम्ही लिहून घ्या, आपण जर एकजुटीने मैदानात उतरलो तर या विधानसभेत महायुतीचा भगवा रोवल्याशिवाय आपल्याला कोणीही रोखू शकत नाही. कारण जनतेला पुन्हा एकदा हे लक्षात आला आहे की, खरे कोण आहे आणि खोटे कोण आहेत. जनता आपल्या पाठीशी आहे. त्यामुळे या खोट्या लोकांना त्यांची जागा दाखवण्यासाठी पुन्हा आपल्याला मैदानात उतरावे लागेल. गेली तीन महिने तुम्ही घरी होता, आता पुढची तीन महिने मला द्या, पुन्हा एकदा मी तुम्हाला राज्यात तुमची सत्ता देतो, असा विश्वास व्यक्त करत देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकांच्या अनुषंगाने तयारी करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

ज्या कार्यकर्त्यांना खऱ्या अर्थाने जिंकण्याची उर्मी आहे आणि पुन्हा एकदा आपण पूर्ण ताकतीने जर का मैदानात उतरलो, तसेच तुमच्या सारखे मावळे जर आमच्या सोबत असतील तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या आशीर्वादाने पुन्हा एकदा तुमचं सरकार मी आणून दाखवेलच, असे थेट आश्वासनच देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना बोलताना दिले आहे.

विरोधी पक्षातील लोक सत्तेत आले तर केवळ पैसा जमा करतात, मात्र सत्ता गेली की यांना गरीब, शेतकरी, कष्टकरी आठवतो. तर माझा यांना सवाल आहे की, गेली ६०-७० वर्ष तुम्ही राज्यात सत्ता उपभोगली. यावेळी तुम्हाला शेतकरी, कष्टकरी का आठवला नाही? तुम्हाला शेतमजूर, गरीब का आठवला नाही? तुम्हाला एससी, एसटी समाज का आठवले नाहीत? सत्तेवरून गेले की या सर्वांची आठवण होते आणि सत्तेवर हे लोक आले की तोंड मिटून ते गप्प बसतात. कारण सत्तेवर आले की तात्काळ स्वतःची घरभरणं, आपल्या तिजोऱ्या भरणं, वेगवेगळ्या प्रकारचे घोटाळे करत जनतेची लूट करणं, हेच यांना ठाऊक आहे. सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता हेच यांचे सूत्र आहे आणि हीच त्यांची मानसिकता असल्याची टीकाही देवेंद्र फडणवीस यांनी केलीय.

### राज्यात महायुतीचीच हवा!

*आपल्या सोबत एक अपघात झालाय. खिंडीत एकदाच कोणाला गाठता येते, मात्र आता चिंता करू नका, कारण मला विश्वास आहे की आपण पूर्ण ताकतीने मैदानात उतरल्यास यश आपल्यापासून दूर नाही. मग तो अमरावती जिल्हा असो की, वर्धा असो, या संपूर्ण महाराष्ट्र. राज्यातील सर्व जागा महायुती जिंकू शकते, अशा प्रकारची हवा आज राज्यात आहे. केवळ तुमच्या मनाचा निर्धार आणि जिंकण्याची उर्मी तुमच्यात पाहिजे, असेही फडणवीस म्हणाले.*

# बहिणीची छेड काढल्याचा जाब विचारणाऱ्या भावाला मारहाण

**नेरळ : प्रतिनिधी**

बहिणीची छेड काढतो म्हणून जाब विचाराला गेलेल्या भावाला चार तरुणांनी बेदम मारहाण केली. बोरगाव येथील आकाश प्रकाश पाटील या तरुणाला नेरळ दामत गावातील तरुणांनी मारहाण केली आहे. मारहाण करणारे तरुणांनी फिर्यादीच्या बहिणीला एकटे पाहून अश्लील चाळे केले होते.



दरम्यान, या बाबत विचारणा केली असता तरुणांनी हातातील लोखंडी कडा डोक्यात मारून आकाश या तरुणास गंभीर जखमी केले. हिंदू-मुस्लिम तरुणांमध्ये झालेल्या या वादाने सुरुवातीला वेगळे वळण घेतले होते, मात्र नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी यांनी जमावाला शांत करीत उशिरा आरोपी तरुणांना ताब्यात घेतले.

**तिघांना अटक**

नेरळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शुक्रवारी (दि. २) नेरळ सीएनजी पंप येथे बोरगाव येथील आकाश पाटील हा रिक्षामध्ये सीएनजी भरण्यासाठी गेला होता. सोबत त्याची बहीण होती. आकाश लघुशंकेसाठी गेला होता. या दरम्यान सीएनजी पंप येथे मारुती स्विफ्ट कारमध्ये चार तरुण उपस्थित होते. तरुणांनी तरुणीला अश्लील नजरेने पाहत हातवारे केले. तिने भाऊ आकाशला हकीकत सांगतली. यावरून जाब विचारण्यासाठी गेलेल्या आकाशला कारमधील चार तरुणांनी बेदम मारहाण केली. आकाश रक्ताच्या थोरोळ्यात खाली पडताच तरुण घटनास्थळावरून पळून गेले. सुरुवातीला रुग्णालयात जाऊन उपचार घेत आकाशने नेरळ पोलीस ठाण्यात आपल्या बहिणीसह तक्रार दाखल केली.

घटनेतील तीन आरोपींना लागलीच दामत गावातून ताब्यात घेतले. यातील २७ वर्षीय मुझमिल मलिक बुबेरे, २५ वर्षीय फरान नासिर नजे, रियाज मो. बिलाल शेख अशी नावे आहेत त्यात एक अल्पवयीन आहे. त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर अल्पवयीन मुलावरदेखील कारवाईचे प्रयत्न सुरू आहेत. पुढील तपास सुरू आहे.

# वावंढळ येथे नेत्र तपासणी शिबिर

चौक : प्रतिनिधी

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल आणि वावंढळ ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने वावंढळ येथील समाज मंदीरात मोफत डोळे तपासणी शिबिर स्वतः डॉ. सुहास हळदीपुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. त्याचा अनेक गरजूंना लाभ मिळाला.



वावंढळ ग्रामपंचायत हद्दीतील व पंचक्रोशीतील नागरिक यांच्यासाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी १४८ जणांची नेत्र तपासणी

लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल, सरपंच सुहास कदम आणि ग्राम पंचायत वावंढळ यांच्या संयुक्तं विद्यमाने करण्यात आली. तर १७ जणांना चष्मे वाटप करण्यात आले, २२ लोकांना मोतिबिंदू शस्त्रक्रिया करावी लागणार असल्याने त्यांना चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या वतीने पनवेल येथे घेऊन जाणार आहेत. नेत्र शस्त्रक्रिया झाल्यावर त्यांना त्यांच्या राहत्या घरी सोडण्यात येणार आहे.

लहान लहान मुलांच्या डोळ्यांचे विकार वाढले आहेत, योग्य वेळी त्यांचीही तपासणी करून घ्यावी असे आवाहन डॉ. सुहास हळदीपुरकर यांनी केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सरपंच सुहास कदम, उपसरपंच ललिता काईनकर, माजी उपसरपंच अमोल कदम, ग्रामसेविका मंगला केदारे, चॅरीटेबल ट्रस्ट चे विनोद पाचघरे, ग्रामपंचायत कर्मचारी, तरुण मंडळ आणि महिला मंडळ यांच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.यावेळी आवश्यक कागद पत्रांची छायांकित प्रत मोफत काढण्याची सुविधा ग्रामपंचायत यांनी उपलब्ध करून दिली होती.

# केदारनाथ अतिवृष्टीत रायगडातील आठ पर्यटक सुखरूप

## दोन पर्यटक अद्याप अडकून

**अलिबाग : प्रतिनिधी**

उत्तराखंड मधील केदारनाथ इथं मुसळधार पावसामुळे झालेल्या विध्वंसानंतर पर्यटक मोठ्या संख्येने अडकून पडले आहेत. रायगड जिल्ह्यातील १० पैकी आठ जण सुखरूप हरिद्वार इथ पोहचले असून दोन जण अद्याप केदारनाथ इथं अडकून पडले आहेत. त्यांना लवकरच सुखरूप आणण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती रायगड जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली.

महाड येथून संदीप झांजे यांच्यासह १० जणांचा ग्रुप केदारनाथ येथे यात्रेसाठी गेले होते. त्यापैकी आठ जण हरिद्वार येथे सुखरूप पोहचले आहेत. गोपाळ पांडुरंग मोरे आणि सुदाम राजाराम मोरे हे केदारनाथ मंदिराजवळील हेलिपॅड येथे अडकले आहेत. त्यांच्यासोबत महाराष्ट्रातील इतर साधारण १२० नागरिक त्याठिकाणी अडकले आहेत, अशी माहिती गोपाळ मोरे यांनी जिल्हा प्रशासनाला दिली.

हवामान खराब असल्यामुळे यात्रेकरूंना हेलिकॉप्टरद्वारे प्रवास करता येत नाही. सर्व जण सुरक्षित असून टप्प्याटप्याने यात्रेकरूंना खाली सोडत आहेत. महाराष्ट्र मंत्रालय नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून उत्तराखंड राज्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यात आला असून आज रात्री पर्यत सर्वांना बाहेर काढण्यात येईल असे सांगण्यात आले. तथापि आवश्यक वैद्यकीय व इतर मदत करण्याची विनंती उत्तराखंड सरकारला केली आहे.

केदारनाथ खोऱ्यात मुसळधार पावसामुळे आलेल्या आपत्तीमध्ये पर्यटक व यात्रेकरु अडकून पडले आहेत. रायगड जिल्ह्यातील जे यात्रेकरू केदारनाथ येथे यात्रेसाठी गेलेले आहेत त्यांच्या कुटुंबियांनी तात्काळ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष रायगड येथे आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांच्याशी ०२१४१-२२२११८, ०२१४१-२२२०९७ अथवा ८२७५११५३३६३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# चौकमध्ये लोकमान्य टिळक व अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

विद्या प्रसारिणी सभा चौक संचलित सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौकमध्ये लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांची पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती करण्यात आली.

या वेळी संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्रभाई शहा यांनी प्रतिमा पूजन करून लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेतील विद्यार्थी जिज्ञासा शेटे, जिया देशमुख व अमेय पाटील व शालेय शिक्षिका साधना माळी यांनी लोकमान्य टिळकांच्या कार्याविषयी व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे कार्य व समाजाप्रती योगदान याविषयी आपले मत व्यक्त केले.

या वेळी संस्थेची सेक्रेटरी योगेंद्र भाई शहा, शाळेचे मुख्याध्यापक भोमले सर, पर्यवेक्षक मोळीक सर, शिक्षिका प्रतिनिधी लिला जाधव सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन उज्वला देशमुख यांनी केले तर किरण क्षिरसागर यांनी मान्यवरांचे आभार मानले.



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात समुदाय सहभाग दिन

पनवेल : रामप्रहर वृत्त

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालयात शासनाच्या शिक्षण सप्ताह अंतर्गत समुदाय सहभाग दिन हा सातवा दिवस साजरा करण्यात आला आणि त्यानिमित्ताने विद्यार्थ्यांतील सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले.



इयत्ता आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना उलवे गावचे ग्रामस्थ आणि पालक यांनी दिलेल्या देणगीतून स्नेहभोजन देण्यात आले. उलवे गावचे ग्रामस्थ राजेश खारकर, शिवम् सोमासे या विद्यार्थ्याचे पालक महेश सोमासे, विजया देवकर व वैष्णवी देवकर यांचे पालक गणेश देवकर, सदिच्छा अडसुळे या विद्यार्थिनीच्या पालकसमृद्धी अडसुळे, भागेश्वर कटके याचे पालक रेश्मा कटके, सोहम पारिंगे या विद्यार्थ्याचे पालक सुवर्णा पारिंगे, भूमिका म्हात्रे या विद्यार्थीनीचे पालक तृप्ती म्हात्रे, समीक्षा खैरे या विद्यार्थिनीचे पालक जयश्री खैरे, श्रुती दापोलकर या विद्यार्थीचे पालक सुरेखा दापोलकर, जीविका घरत या विद्यार्थ्यांचे पालक विद्या घरत, श्रेया खैरे या विद्यार्थिनीचे पालक दिपाली खैरे, चिन्मय महाले या विद्यार्थ्याचे पालक रागिनी महाले या सर्वांनी मिळून विद्यार्थ्यांच्या स्नेहभोजनासाठी देणगी दिली. याच कार्यक्रमात रागिनी महाले यांनी विद्यार्थ्यांसाठी प्रथमोपचार पेटी भेट दिली.

या स्नेह भोजनाचे आयोजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी केले होते. त्याचबरोबर विद्यालयाच्या उपशिक्षिका विशाखा गावंड, पल्लवी पवार, वेदांगी म्हात्रे, आशा कस्पटे या सर्वानी समुदाय सहभाग दिवस उत्साहात साजरा केला.

# गव्हाण विद्यालयात क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्री सरकारचे संस्थापक थोर देशभक्त क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी (दि. ३) रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

हा कार्यक्रम इयत्ता आठवी अ च्या वतीने साजरा करण्यात आला. वर्गशिक्षिका आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. वर्गप्रतिनिधी दिव्या बालाजी केंद्रे, प्रांजळ विक्रम पडवळ आणि इतर विद्यार्थ्यांनी रांगोळी काढून प्रतिमा पूजनाची तयारी केली.

यानंतर विद्यालयाचे आदरणीय प्राचार्य जी.सी. गोडगे यांनी प्रतिमापूजन केले. कनिष्ठ महाविद्यालयाचे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक यु.डी. पाटील यांनी श्रीफळ वाढविले. या वेळी उपप्राचार्य पी.बी. मंडले, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आर.एस. भोईर, संगणक शिक्षिका ज्योत्स्ना कोळी, सोनाली घरत तसेच उपशिक्षिका रोहिणी घरत, अपर्णा देवकुळे ज्येष्ठ शिक्षक डि.के. म्हात्रे आणि सर्व रयत सेवक उपस्थित होते.

या वेळी इयत्ता पाचवी ब मधील श्रीधर सुतार या विद्यार्थ्यांचे भाषण लक्षवेधी ठरले. त्याचप्रमाणे तनुश्री गुळवे आणि दिव्या केंद्रे या मुलींनीही आपल्या मनोगतातून क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्याची महती सांगितली. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग शिक्षिका एच. आर. पाटील आणि आभार पी. एन. परदेशी यांनी मानले.



पान १ वरून

## भव्य रोजगार मेळाव्यात १८२८ उमेदवारांचा सहभाग

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारिणी सदस्य अनिल भगत, संजय भगत, भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, प्राचार्य एस.के. पाटील, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, माजी उपमहापौर चारूशीला घरत, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, मनोहर म्हात्रे, विकास घरत, प्रवीण पाटील, विजय चिपळेकर, भाजप अनुसूचित सेलचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, महिला मोर्चाच्या शहराध्यक्ष राजेश्री वावेकर, कामगार नेते जितेंद्र घरत, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, अॅड. चेतन जाधव, प्रदीप भगत, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे आदी उपस्थित होते.

अविनाश धर्माधिकारी यांनी पुढे बोलताना सांगितले की, नमस्कार आणि सर्वांना सर्वकाळ सर्व शुभेच्छा हे जीवनातील दोन मंत्र आहेत. समोरच्या व्यक्तीला नमस्कार केल्याने आपल्यात आणि त्या व्यक्तीमध्ये ईश्वरी चैतन्य निर्माण होते, तर दुसऱ्या मंत्रामुळे सर्व विश्वाचे कल्याण करण्याची शक्ती मिळते. सर्व विश्वाचे कल्याण करणारी आपली भारतीय संस्कृती आहे आणि जगाला कल्याणाची शिकवण आपल्या देशाने दिली आहे. संकल्प आपल्या आयुष्याला आकार देण्याचे काम करतो. आपण जसे व्यक्तिमत्व घडवू तसा जीवनाला आकार येतो. माणूस म्हणून आपल्याला सन्मानाने जगता आले पाहिजे आणि त्यासाठीही संकल्प महत्त्वाचा असतो. सर्व करिअर चांगले आणि समान असतात. फक्त त्याची निवड आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार करणेही तेवढेच गरजेचे असते आणि हे करताना बदलता काळही लक्षात घेतला पाहिजे.

शिक्षणातून करिअर करताना भारतमातेची सेवा झाली पाहिजे हेही आपल्या मनात रूजले पाहिजे आणि त्या अनुषंगाने केलेली वाटचाल मार्गदर्शक ठरणार आहे. जगात दिवसेंदिवस बदल घडत आहे आणि पुढील सहा वर्षात एआय विज्ञान क्षेत्रामुळे प्रचंड बदल व तसा त्याचा परिणाम होणार आहे. एआयमुळे रोजगार कमी होणार असले तरी त्या क्षेत्रातील रोजगारांची निर्मितीही मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यामुळे त्याचाही वेध घेत त्यामध्येही करिअरची संधी असल्याचे धर्माधिकारी यांनी सांगितले. तंत्रज्ञान बदलेल, संधी बदलतील, मात्र स्पर्धा परीक्षा कायम राहतील. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात करिअर करावे, असे आवाहनही त्यांनी करत सीकेटी महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राला आवश्यक ते सहकार्य करणार असल्याची ग्वाही दिली.

अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हटले की, आपला देश विविध संस्कृतींनी नटलेला आहे आणि या देशाचा सुजाण नागरिक होणे ही सर्वांची जबाबदारी आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा बलाढ्य भारत आहे. त्यामुळे प्रत्येक तरुणाने त्याची जाणीव ठेवून मार्गक्रमण केले पाहिजे. विज्ञान पुढे जात आहे आणि त्यानुसार काळ बदलत आहे. त्यामुळे आपण निवडलेले क्षेत्र हे जीवनाला दिशा देणारे असले पाहिजे. त्यासाठी मेहनत घ्या आणि कुटुंबासोबत देशही महत्त्वाचा आहे, त्या अनुषंगाने अविनाश धर्मधिकारी यांनी आपल्या अमूल्य मार्गदर्शनातून दिलेल्या सूचना आत्मसात करा, असे आवाहनही त्यांनी केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना, अटल सेतू, आंतरराष्ट्रीय विमानतळ, जेएनपीएमुळे आगामी पाच वर्षाच्या काळात या परिसरात जगातील विविध प्रकल्प येणार आहेत तसेच या ठिकाणी असलेल्या अनेक विद्यापीठातून विविध शैक्षणिक कोर्सेस उपलब्ध आहेत. त्या अनुषंगाने आजच्या विद्यार्थ्यांना संधींचे द्वार उपलब्ध होणार आहे. त्यानुसार परिसरात येणाऱ्या संधींचे सोने करण्यासाठी विद्यार्थांनी आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढवावी, असे आवाहन केले.

पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस.के. पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख जे.एम. पावरा यांनी केले.

### पात्र उमेदवारांना ऑन दि स्पॉट अपॉईंटमेंट लेटर

***युवकांच्या समस्यांची जाण असलेले कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनाखाली झालेल्या भव्य रोजगार मेळाव्यामध्ये १८२८ उमेदवारांनी सहभाग घेतला होता. या अनुषंगाने विविध क्षेत्रातील रिलायन्स, एसबीआय लाईफ इन्शुरन्स, टाटा स्ट्राईव्ह, गुगल पे, आदित्य बिर्ला, आयसीआयसीआय बँक, ओला, युरेका फॉर्ब्स, एलआयसी, फोन पे, डॉ. रेड्डी फाऊंडेशन, जिओ अशा नामांकित ६० कंपन्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्यात आले. या वेळी काही पात्र उमेदवारांना ऑन दि स्पॉट अपॉईंटमेंट लेटर लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, प्राचार्य एस.के. पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.***

**दुखवटा**

## रमाकांत गोंधळी



**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर कातळपाडा येथील रमाकांत चिंतामण गोंधळी (वय ६७) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन सासुरवाशीन मुली, एक मुलगा, सुन, जावई, नातवंडे अस त्यांचा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि. १०) श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होईल. तर उत्तरकार्य विधी मंगळवारी (दि. १३) चिरनेर कातळपाडा येथील राहत्या घरी होणार असल्याची माहिती गोंधळी परिवाराकडून देण्यात आली आहे.

## निवडक

### दुकानातील रोख रकमेची चोरी

**पनवेल :** दुकानाच्या शटरचे लॉक तोडून अनोळखी व्यक्तीने ३० हजार रुपये आणि चांदीचे १२ नग चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०५ (अ) आणि ३३१ (चार) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. ज्योती संजय भंडारी या खारघर येथे राहत असून त्यांचे नवीन पनवेल सेक्टर १५ ए येथे दागिना ज्वेलरी अँड आर्ट स्टुडिओ आहे. ३१ जुलै रोजी त्यांच्या दुकानाच्या शटरचे लॉक तोडून अनोळखी व्यक्तीने दुकानात प्रवेश केला आणि तीस हजार रुपये रोख रक्कम आणि नऊ हजार रुपयांच्या चांदीचे कानातील १२ नग चोरून नेले.

### तक्का येथे सहा दुकानांमध्ये चोरी

**पनवेल :** तक्का येथे जवळपास सहा दुकानांचे शटर उचकटून चोरट्यांनी चोरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही चोरी पहाटे चार वाजण्याचा सुमारास झाली आहे. २७ जुलै रोजी पहाटे साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी तक्का येथील चार मेडिकल, दूध डेरी आणि अन्य एका ठिकाणी शटर उचकटून चोरी केली. यात मेडिकलमधील रोख रक्कम आणि इतर वस्तू चोरीला गेल्याचे समोर आले आहे. ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली असून शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

### कळंबोलीतील शाळेत दीपपूजन

**कळंबोली :** सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील मराठी प्राथमिक विद्यालयात सांस्कृतिक विभागातर्फे दीपपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विविध प्रकारच्या दिव्यांचे पूजन करून त्यांचे प्रज्वलन करण्यात आले. विद्यार्थ्यांना दीपप्रज्वलनाचे व दीप अमावस्याचे महत्त्व विशद करून सांगण्यात आले. विद्यालयात दिव्यांची रांगोळी काढून त्यामध्ये मोठी समई ठेवून त्याच्या आजूबाजूला विविध प्रकारच्या छोट्या छोट्या दिव्यांचे प्रज्वलन करण्यात आले. या दीप अमावस्या कार्यक्रमात शिक्षक, विद्यार्थी व पालक वर्गाने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे प्रमुख नारायण सावंत यांनी केले होते.



# दरडग्रस्त माडभुवनवाडीचे लवकरच पुनर्वसन

## आमदार महेश बालदी यांच्या हस्ते ९७ आदिवासी कुटुंबांना प्लॉटचे वाटप





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आपटा सारसई येथील दरडग्रस्त माडभुवनवाडीतील ग्रामस्थांचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने पाताळगंगा एमआयडीसीच्या जागेत पुनर्वसन करण्यास शासनाने मंजुरी दिली असून ३०० गुंठे जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या दरडग्रस्त वाडीतील ९७ कुटुंबांना आमदार महेश बालदी यांच्या हस्ते शनिवारी (दि.३) प्लॉटच्या सनदचे वाटप करण्यात आले.

पनवेल तालुक्यातील आणि उरण विधानसभा मतदारसंघातील आपटा सारसई येथे माडभुवन ही आदिवासीवाडी आहे. गेल्या पावसाळ्यात येथील ग्रामस्थांनी डोंगराला मोठ्या भेगा पडल्याचे आमदार महेश बालदी यांच्या निदर्शनास आणून दिले होते. इर्शाळवाडीचे दुःख प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या आमदार महेश बालदी यांनी याची पुनरावृत्ती माडभुवनवाडीत होऊ नये यासाठी गांभीर्याने शासन, प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यास यश आले आणि पाताळगंगा परिसरात एमआयडीसीच्या जागेत वाडीचे पुनर्वसन करण्याची मंजुरी शासनाने दिली. त्यासाठी शासनाने ३०० गुंठे जागा एमआयडीसीकडून उपलब्ध करून दिली आहे.

माडभुवनवाडीतील ९७ कुटुंबांना शनिवारी आमदार महेश बालदी यांच्या हस्ते प्लॉटच्या सनदचे वाटप करण्यात आले. लवकरच या जागेवर शासनाकडून पुनर्वसन करण्यात येईल, असे मत या वेळी आमदार महेश बालदी यांनी बोलताना व्यक्त केले.

या कार्यक्रमास माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, पनवेल तालुका भाजपचे उपाध्यक्ष विद्याधर जोशी, ज्येष्ठ कार्यकर्ते संजय टेंबे, सरपंच निकिता भोईर, उपसरपंच मयूर शेलार, माजी सरपंच ज्ञानेश्वर भोईर, सदस्य असद पिट्टू, मारूती चव्हाण, राजेश देशमुख, पांडुरंग लेंडे, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत आणि मोठ्या संख्येने वाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते.

## सीकेटी कॉलेजमध्ये मोडीलिपी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने २९ जुलै ते ३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत मोडीलिपी प्रारंभिक प्रशिक्षणकार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



या कार्यशाळेसाठी प्रसिद्ध मोडीलिपी अभ्यासक महेश जोशी, अध्यक्ष वसुंधरा भाषा मोडीलिपी संवर्धन आणि संशोधन केंद्र, पुणे हे प्रमुख प्रशिक्षकलाभले होते. या कार्यशाळेचा उद्घाटन समारंभ सोमवारी (दि. २९ जुलै) झाला. या वेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. इतिहास विभागाच्या ६४विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला होता. कार्यशाळेत महेश जोशी यांनी विद्यार्थ्यांना मोडीलिपी अध्ययनाचे आणि संशोधनाचे महत्त्व समजावून सांगून मोडीलिपीचे प्रारंभिक ज्ञान देवूनस्वतःचे नाव लिहिणे, मोडीलिपीलिप्यांतर, उतारा वाचन वनाममुद्राबनविण्यास शिकविले. या कार्यशाळेचा समारोप समारंभ शनिवारी (दि. ३) झाला.

कार्यशाळेचे यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, आय.क्यू. एस. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. एस.एन.वाजेकर यांनी मार्गदर्शन आणि शुभेच्छा दिल्या. या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी इतिहास विभागाच्या प्रमुख डॉ. रत्नप्रभा म्हात्रे आणि प्रा. भावेश भोईर यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पनवेलमध्ये उद्या 'भजन स्वरपुष्प'

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून नादब्रम्ह साधना मंडळ खारघर व पनवेल तालुका सांस्कृतिक सेल यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. ५) शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन संगीतची सुश्राव्य मैफिल अर्थात 'भजन स्वरपुष्प' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



पनवेल शहरातील मार्केट यार्डमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सोमवारी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमासाठी प्रमुख मान्यवर म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, भजनरत्न महादेवबुवा शहाबाजकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, सुरेश खडके, ह.भ.प. नंदकुमार कर्वे आदी उपस्थित असणार आहेत.

या वेळी भजन स्वरपुष्प कार्यक्रमात छत्रपती संभाजी नगर येथील गायक ओम बोंगाणे यांचे शास्त्रीय व उपशास्त्रीय गायन होणार आहे. त्यांना तबल्यावर विनायक नाईक, हार्मोनियमवर मंदार दिक्षित व पखवाजवर सूरज गोंधळी यांची साथ असणार आहे. त्यानंतर रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्या गायनाने समारोप होणार आहे. त्यांना वसंतशेठ पाटील, कृष्णा पवार, नारायणबुवा पाटील, मोतीराम कडू, जगदिश म्हात्रे व नादब्रम्ह साधना मंडळ शिष्य परिवाराची साथसंगत तर तबल्यावर कौस्तुभ भाग्यवंत यांची साथ असणार आहे.

या कार्यक्रमाचा रसिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक अक्षय चौधरी यांनी केले आहे.

## गिरीश वेदक सेवानिवृत्त

**पनवेल :** दी न्यू इंडिया अशुरन्स बेलापूर चे असिस्टंट मॅनेजर गिरीश शरद वेदक हे नुकतेच ३५ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त झाले.



गिरीश वेदक हे पॉवरलिफ्टींग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष आहेत. पॉवरलिफ्टिंग रायगड चे कार्याध्यक्ष यशवंत मोकल, कार्यकारणी सदस्य सुभाष टेंबे, सहसचिव सचिन भालेराव, सचिव अरुण पाटकर यांनी गिरीश वेदक यांचे निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार केला.



**खारघर : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अटल फाउंडेशनतर्फे सेक्टर १९च्या मैदानात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अटल फाउंडेशनचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला.**

## योगेश पाटील, अनंत पाटील भाजपमधून निलंबित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदईचे माजी उपसरपंच योगेश अनंत पाटील आणि अनंत महादू पाटील यांनी पक्षविरोधी कारवाया केल्यामुळे त्यांचे भारतीय जनता पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबन करण्यात आले आहे. भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी ही माहिती दिली.

## संत नामदेव महाराज पुण्यतिथी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

संतशिरोमणि नामदेव महाराज यांचा पुण्यतिथीसोहळा पनवेल येथील पुरातन रामदास मारुती मंदिरात ३१ जुलै ते २ ऑगस्ट या कालावधीमध्ये झाला. कीर्तनभास्कर नंदकुमार कर्वे यांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.



आषाढ वद्य त्रयोदशी २ ऑगस्ट रोजी ह. भ. प. वर्षा रानडे-सहस्रबुद्धे यांच्या कीर्तनाने सोहळ्याची सांगता झाली. या सोहळ्यात ३१ जुलै व १ ऑगस्ट रोजी ह.भ.प. श्रीनिवास काजरेकर आणि वैद्य गौरी कुलकर्णी यांनी कीर्तनसेवा केली. नंदकुमार कर्वे व चंद्रकांत मने यांनी संवादिनी व शार्दूल डोंगरे आणि गणेश घाणेकर यांनी तबलासाथ केली.

या सोहळ्याला ज्येष्ठ कीर्तनकार चारुदत्त जोशी, समीरबुवा ओझे, मनस्वी गद्रे, अवनी गद्रे, मंजुषा कदम, शालनताई आवळे, सुखदा मुळ्ये-घाणेकर, सुनिता खरे, विजया मर्ढेकर आदींची उपस्थिती होती. मंदिर समितीचे विश्वस्त चंद्रशेखर खरे आणि माधवकाका जोशी यांनी या सोहळ्याचे उत्तम नियोजन केले.

## युईएस स्कूलमध्ये दीपपूजा उत्साहात

**उरण : वार्ताहर**

दीप अमावस्येच्या निमित्ताने शनिवारी (दि. ३) युईएस स्कूलमध्ये 'दीपपूजा उत्सव' साजरा करण्यात आला. दीपपूजेसाठी माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे दिवे आणले होते.

एका टेबलावर समया, लामणदिवे, पणत्या, निरांजने असे अनेक प्रकारचे रंगीबेरंगी दिवे मांडून सजावट करण्यात आली होती. या वेळी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी गीत सादर केले.

युईएस संस्थेच्या सहसचिव अ‍ॅड. अपूर्वा ठाकूर, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका ह्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात झाला.



## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात पालक-शिक्षक सभा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.३) पालक-शिक्षक समितीतर्फे तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक सभेचे आयोजन केले होते.

या पालक-शिक्षक सभेसाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी उपस्थित राहून त्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक विकास, वर्गांमध्ये असणारी उपस्थिती तसेच वेगवेगळ्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग याविषयी वर्गशिक्षकांशी संवाद साधला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी उपस्थित पालकांशी संवाद साधून महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी घेण्यात येणारे वेगवेगळे शैक्षणिक, सामाजिक, पर्यावरणीय उपक्रम, अभ्यासक्रम, करियर गायडन्स सत्रे तसेच, प्लेसमेंट ड्राईव्ह, मूल्यमापन पद्धती तसेच महाविद्यालयात घेण्यात येणारे आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा त्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले व सर्व पालकांच्या शंकांचे निरसन केले.

प्रा. मनीषा शिलेदार व एमकेसीएलचे सर्व पदाधिकाऱ्यांनी महाविद्यालयात सुरू करण्यात येणाऱ्या एमकेसीएलच्या वेगवेगळ्या कोर्सेसबद्दल पालकांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या पालक शिक्षक सभेचे आयोजन प्रा. नीलम मोरे, प्रा. तनुजा सुमन यांनी केले तसेच, प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष, प्रा. डॉ. रीत ठुले प्रा. विशाल देशमुख, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. प्रवर शर्मा हे सर्व विभाग प्रमुख तसेच पालक-शिक्षक समितीतील इतर सर्व सदस्यांनी तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# हम आपके है कौन ३० वर्ष

## सिनेमा नव्हे; दिमाखदार लग्न सोहळा

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

ठहरो...! यह शादी नही होगी!! नायक नायिकेचा लग्न सोहळा सुरू असतानाच कोणीतरी असे मोठ्याने ओरडतो आणि चक्क लग्न सोहळा थांबतो.

फार पूर्वीच्या हिंदी चित्रपटातील हा जणू हुकमी प्रसंग अथवा नायक नायिकेचे लग्न होते आणि पिक्चर संपतो हे जणू ठरलेले. अधूनमधून नायक अथवा नायिकेला लग्नाचा वेगळा निर्णय घ्यावा लागे इतकेच (बी. आर. चोप्रा दिग्दर्शित 'गुमराह'मध्ये तेच तर होते आणि याच चित्रपटातील कथा कल्पनेत काही फेरफार केलेला यश चोप्रा दिग्दर्शित 'सिलसिला'ही तसाच, नायिकेस लग्नाची वेगळी वाट धरायला लावणारा). यात फरक पडणे आवश्यक होतेच. तो अचानक पडला. असं काही अनपेक्षित होणे आवश्यक असतेच.

ते घडले राजश्री प्रॉडक्सन्सच्या सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन' (प्रदर्शन ५ ऑगस्ट १९९४) या चित्रपटाने! या चित्रपटाने असे काही घडले/घडवले की त्याचे सुपरिणाम आजही दिसताहेत. आता उच्चभ्रू आणि श्रीमंत खानदानातील लग्न म्हणजे मेगा इव्हेन्टस झालाय, उपग्रह वृत्तवाहिनीवर त्याचे लाईव्ह कव्हरेज असते. रूपेरी पडद्यावर जे पेरले ते असे उगवलंय.




याच 'हम आपके....'ला चक्क तीस वर्षे कधी बरे पूर्ण झाली हे समजलेच नाही. हीच तर यशस्वी चित्रपटाची गंमत असते. ते पडद्यावरून उतरले तरी कधी लोकप्रिय गाण्यांमुळे, कधी टाळीबाज जोरदार दमदार संवादाने, तर कधी एखाद्या खमंग गॉसिप्सने सतत डोळ्यासमोर असतात. विशेष म्हणजे ज्या लिबर्टी चित्रपटगृहात या चित्रपटाने खणखणीत शंभरपेक्षा जास्त आठवडे यशस्वी मुक्काम केला, त्याच लिबर्टीत हा या चित्रपटाला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्याचा ग्लॅमरस सोहळा तशाच झगमगाटात साजरा झाला. अगदी सलमान खान, माधुरी दीक्षित, रेणुका शहाणे, मोहनीश बहेल (हा आपली पत्नी एकतासोबत), दिग्दर्शक सूरजकुमार बडजात्या, संगीतकार राम लक्ष्मण असे सगळेच या विशेष खेळास हजर होते. त्या चित्रपटाबाबत त्यांच्या व या चित्रपटाशी संबंधित प्रत्येक लहान मोठा कलाकार, तंत्रज्ञ तर झालेच, पण रसिकांच्याही आठवणी खूप. अर्थात हे सगळेच प्रचंड उत्साहात होते. अशा प्रकारचा इव्हेन्टस ही आजच्या चित्रपटसृष्टीतील दुर्मिळ गोष्ट, म्हणूनच महत्त्वाची. जॉन मॅथ्यूज मथान दिग्दर्शित सरफरोश (मुंबईत रिलीज ३० एप्रिल १९९९)ला पंचवीस वर्ष पूर्ण झाल्यानिमित्तच्या जुहूच्या एका मल्टीप्लेक्समधील इव्हेन्टस मी अनुभवला. असे अनेक चित्रपटांच्या पंचवीशी/पन्नाशीचे इव्हेन्टस व्हायला हवेत. तेवढीच फ्लॅशबॅकमध्ये जाण्याची संधी.


पूर्वी अशा पद्धतीने लोकप्रिय चित्रपट तब्बल शंभर आठवड्याचे यश संपादत ही आजच्या पिढीसाठी कुतूहल निर्माण करणारी गोष्ट. आणि एक महत्त्वाचे, पूर्वी चित्रपटाच्या गुणवत्तेवर चौफेर आणि खोलवर लिहिले जाई, गुण दोषांचे मूल्यमापन होई. आज चित्रपट रिलीज होतोच तोच त्याने किती कोटीची कमाई केली याच्या ब्रेकिंग न्यूज होऊ लागल्यात. अशा परिस्थितीत 'हम आपके है कौन 'सारख्या चित्रपटाचा त्या काळात कसा सामाजिक/सांस्कृतिक/माध्यम क्षेत्रावर प्रभाव होता याची आठवण करून देण्याची संधी महत्त्वाची आहे.

'हम आपके है कौन' म्हणजे, सामाजिक/सांस्कृतिक/आर्थिक/वैवाहिक वाटचालीतील एक महत्त्वाचा टप्पा. हा फक्त चित्रपट नव्हे, तर अनेक पद्धतीने समाज ढवळून काढणारी सकारात्मक, उत्स्फूर्त गोष्ट, शानदार सोहळा आहे.

हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासावर फोकस टाकताना रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' (प्रदर्शन १५ ऑगस्ट १९७५) पूर्वीचा आणि नंतरचा चित्रपट असा विचार होतो अथवा तसाच तो करावा लागतो (या मताशी चित्रपट अभ्यासक/विश्लेषक नक्कीच सहमत होतील. जनसामान्यांपर्यंत पोहचलेल्या चित्रपटाचा अभ्यास तसा अवघड, कारण ते चित्रपट लोगों के दिल मे कायमच आठवणीच्या व्याजासह असतात) आणि त्यानंतरचा महत्त्वाचा चित्रपट 'हम आपके है कौन' (प्रदर्शन ५ ऑगस्ट १९९४). याच्यापासून हिंदी चित्रपटात चकचकीतपणा आलाय, चित्रपटगृह संस्कृतीत बदल होत गेला. त्यानंतर काही वर्षातच मल्टीप्लेक्स युग अवतरले आणि मग ते स्थिरावलेही. आता आपण ओटीटीपर्यंत येऊन पोहचलोय. 'तरी हम आपके...'ची जादू कायम.

'हम आपके....'ला यशस्वी वाटचालीला खणखणीत तीस वर्षे पूर्ण झाली असली तरी तो अनेक बाबतीत आजही आजच्या काळाचा चित्रपट आहे आणि हे या चित्रपटाचे खूपच मोठे यश आहे. जुने दिवस आठवले की... असे जे म्हणतात ते या चित्रपटालाही लागू आहे.

आज एखाद्या उपग्रह वाहिनीवर तो अथवा त्यातले दीदी तेरा देवर दीवाना गाणे पुन्हा पुन्हा पाहताना त्याचा आस्वाद अथवा गोडी जराही कमी होत नाही. यालाच सर्वकालीन तजेलदार कलाकृती म्हणतात आणि 'हम आपके...'लाही त्याचे श्रेय जाते. हिंदी चित्रपटसृष्टीतील मेहबूब खान दिग्दर्शित मदर इंडिया (१९५७), के. असिफ दिग्दर्शित 'मुगल ए आझम' (१९६०), सतराम रोहरा दिग्दर्शित 'जय संतोषी मा' (रिलीज ३० एप्रिल १९७५) आणि रमेश सिप्पी दिग्दर्शित




'शोले' (प्रदर्शन १५ ऑगस्ट १९७५) यांच्याप्रमाणे अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचलेला आणि समाजातील सर्वच स्तरांवर चर्चा झालेला असा 'हम आपके है कौन' आहे. हे चित्रपट न पाहिलेले चित्रपट रसिक सापडणे अशक्यच आहे आणि हेच या चित्रपटांचे मोठे यश आहे. काही चित्रपट हे न पाहिलेला माणूस हा एक वेगळाच शोध ठरावा.

'मैने प्यार किया' (१९८९)च्या यशानंतर कसलीही घाई न करता अतिशय शांतपणे आणि भरपूर पूर्वतयारी करून सूरजकुमार बडजात्याने 'हम आपके...'च्या निर्मितीची तयारी करेपर्यंत काही महत्त्वाच्या गोष्टी घडल्या. सलमान खान आणि माधुरी दीक्षित 'स्टार' झाले होते. राजश्री प्रॉडक्सन्सच्या 'अबोध' (१९८४) व्दारे माधुरी चित्रपटसृष्टीत आल्याची तिने जाणीव ठेवून या चित्रपटाला होकार दिला तर 'मैने प्यार किया'च्या यशाने आपण 'स्टार' झाल्याने सलमानचा होकार होता. दोघेही आजही स्टार आहेत. राजश्री प्रॉडक्सन्स कायमच कौटुंबिक वातावरणात चित्रपट निर्मिती करीत आल्याने त्यांना अशा पध्दतीने अनेक कलाकार जोडले गेले. 'हम आपके...' सेटवर जाईपर्यंत आपल्या देशात खुली अर्थव्यवस्था आणि जागतिकीकरणाचे वारे आले. उपग्रह वाहिनीच्या आगमनाने 'घरात चोवीस तास माहिती आणि मनोरंजनाचे पेव' फुटले. त्यातून आपली शहरी जीवनशैली बदलायला सुरुवात झाली होती. एखाद्या कलाकृतीचे मूल्यमापन करताना तत्कालिक सामाजिक, सांस्कृतिक स्थितीचाही विचार करणे आवश्यक आहे. या चित्रपटाचे प्रामुख्याने मेहबूब स्टुडिओ आणि फिल्मीस्थान स्टुडिओत दीर्घकालीन शूटिंग सत्र सुरू असताना आम्हा सिनेपत्रकाराना मात्र सेटवर प्रवेश नव्हता. त्या काळात मुंबईतील कोणत्याही चित्रपट स्टुडिओत नवीन चित्रपटाचा मुहूर्त अथवा शूटिंग कव्हरेज वा एखाद्या स्टारच्या मुलाखतीसाठी गेल्यावर तेथे आणखी कोणाचे शूटिंग चाललंय, कोणी कलाकार भेटता येईल का हे जाणून घेण्याची सवयच होती आणि त्यातून काही साध्य होईदेखील, पण 'हम आपके...'साठी दरवाजे बंद असल्याने 'असं काय बरे चित्रीत होतेय' याचे विलक्षण कुतूहल होते. इतर वेळी वा इतर चित्रपटाच्या निमित्ताने माधुरी तर झालेच, पण आपले रिमा लागू, लक्ष्मीकांत बेर्डे, प्रिया अरुण यांजकडून या चित्रपटाबाबत काही गोष्टी समजल्याने आणखी उत्सुकता वाढे. त्या काळात कलाकार अतिशय मोकळेपणाने आम्हा सिनेपत्रकारांशी बोलत. याचं कारण आम्ही त्यांचे काम पाहिलेले असे.

त्या काळात आपला चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज झाला की राजश्री प्रॉडक्सन्सच्या वतीने त्या चित्रपटाचे दिग्दर्शक आणि कलाकार यांच्या मीडिया भेटीगाठीसाठी टी पार्टीचे आयोजन केले जाई. त्यामुळे नवीन कलाकारांशी भेटीगाठी होत. ही प्रथा यावेळी टाळून सलमान व माधुरीचे विविध स्टाईलचे आकर्षक दिलखेचक फोटो सुरुवातीला मीडियाला मोठ्या प्रमाणात दिले गेले. आणि असा एक नवीन ट्रेन्ड सुरू झाला. काही दिवसांनी चित्रपटातील फोटो दिले गेले. गाणी प्रकाशित झाली. हळूहळू ती लोकप्रिय झाली. त्याची एकूण संख्या चौदा आहे हे मात्र कुतूहल वाढवणारे होते. या सगळ्यात 'मुलाखतीचा कसलाच मारा' नव्हता. आपला हा चित्रपटच काय ते बोलले यावर त्यांचा विश्वास आहे हे लक्षात येत गेले. ही रणनीती योग्य होती आणि ती फळलीदेखील.

हा चित्रपट प्रत्येक शहरातील फक्त आणि फक्त एकाच चित्रपटगृहात प्रदर्शित होणार हे कुतूहल वाढवणारे होते (मुंबईत लिबर्टी चित्रपटगृह), पण राजश्री प्रॉडक्सन्सच्या वितरण विभागाकडून अशा व्यावसायिक खेळी यशस्वी होत. त्यांनी 'गीत गाता चल' (१९७६) असाच मुंबईत फक्त मेट्रो या एकमेव चित्रपटगृहात रिलीज केला आणि यशस्वी ठरल्यावर दहा आठवड्यानंतर प्रिंटची संख्या वाढवली (सचिन पिळगावकर ही आठवण जपून आहे. त्याचा नायक म्हणून हा पहिलाच चित्रपट). 'हम आपके...'चा आम्हा समिक्षकांसाठी स्वतंत्र शो न करता लिबर्टीच्या फर्स्ट डे फर्स्ट शोचे महागडे तिकीट दिले. या चित्रपटासाठी अप्पर स्टॉल ७५ रुपये, बाल्कनी १००, तर ड्रेस सर्कल १२० रुपये तिकीट दर पाहून हबकलो. हिंदी चित्रपट आता गरीबांची करमणूक राहणार नाही या सामाजिक, सांस्कृतिक बदलाची ही सुरुवात होती. लिबर्टी थिएटरवर उच्चभ्रू आणि नवश्रीमंत वर्गाची गर्दी होती.



थिएटरमध्ये चित्रपटातील अनेक गोष्टींच्या प्रतिकृती विक्रीसाठी उपलब्ध होत्या. वातावरणात फिल गुड होता. आपला हा चित्रपट सुपर हिट होणारच याची जणू राजश्री प्रॉडक्सन्सला खात्री होती. चित्रपटातील गीत संगीत व नृत्याची भव्य मेजवानीत रसिक गुंतलेत याची कल्पना येत असतानाच 'दीदी तेरा देवर दीवाना...' गाण्याला पडद्याभोवती दिमाखदार रोषणाई झाली आणि वातावरणात आणखी उत्साह आला. हा चित्रपट अनुभवणे म्हणजे एक प्रकारचा फेस्टीवलच होता. विशेष उल्लेखनीय आठवण, आम्ही चित्रपट समिक्षकांनी दोन मध्यंतरचा 'हम आपके...' एन्जॉय केला. चित्रपट पहायला जाईपर्यंत याची काहीच कल्पना नव्हती आणि राजश्री प्रॉडक्सन्सच्या वतीनेही त्याची न्यूज केली नाही. पहिल्याच शोपासूनच हायफाय रसिकांचा हाऊसफुल्ल गर्दीचा प्रतिसाद पाहतानाच चित्रपटाची लांबी जास्त आहे हे लक्षात घेऊन त्यातील थोडासा भाग कापून तो एका मध्यंतरचा करण्यात आला...

हा चित्रपट म्हणजे, पडद्यावरच्या





कौटुंबिक सोहळ्यात आपण प्रेक्षकांनीही मनसोक्त मनमुराद आनंद घेत रमून जायचे हेच आहे, हे मला एकूणच या अनुभवातून लक्षात आले आणि मग हा चित्रपट प्रचंड लोकप्रिय ठरत ट्रेन्ड सेटरही ठरला.

चित्रपट विश्लेषक म्हणून माझे असे मत होते, पण समिक्षक म्हणून 'हा चित्रपट म्हणजे पडद्यावरचे छायागीत तर नाही?' असा प्रश्न पडला. काही समिक्षकांनी या चित्रपटाला 'लग्नाची व्हीडीओ कॅसेट' म्हटले, पण प्रेक्षकांनी मात्र हा चित्रपट प्रचंड उचलला आणि मग एकेका गोष्टीची चर्चा रंगली. त्या काळात नुकताच प्रदर्शित झालेला चित्रपट चोरट्या मार्गाने व्हिडीओवर येई, ही चोरी टाळण्यासाठी असा एकाच थिएटरमध्ये सिनेमा रिलीज केला. राजश्री प्रॉडक्सन्सकडून रात्रीचा खेळ संपल्यावर चित्रपटाची प्रिंट ताब्यात घेतरी जाई आणि दुसऱ्या दिवशी दुपारी घेऊन येई. ही आयडिया त्यांना निर्माता, दिग्दर्शक आणि वितरक विजय कोंडके यांनी दिली. त्यांनी 'माहेरची साडी' (१९९१)च्या वेळेस अशीच काळजी घेतली होती. 'हम आपके...'ने रसिकांच्या मनात स्थान मिळवले आणि मग त्याच्या थिएटरमध्ये वाढ करण्यात आली. खुद्द लिबर्टी थिएटरमध्ये चित्रपटाने खणखणीत रौप्यमहोत्सवी आठवडा गाठला. खरंतर राजश्री प्रॉडक्सन्सच्याच गोविंद मुनिस दिग्दर्शित 'नदिया के पार' (१९८२) या चित्रपटाची ही चकाचक शहरी रिमेक होती. मूळ चित्रपट ग्रामीण होता. सचिन पिळगावकर आणि साधना सिंगची प्रमुख भूमिका होती. हिंदी व भोजपुरी भाषेच्या मिश्रणातून रंगलेल्या या चित्रपटाने उत्तर भारतातील छोट्या शहरात घवघवीतपणे यश मिळवले. त्याचा रिमेक करताना 'हम आपके...'मध्ये गाण्यांची संख्या वाढवली. सगळ्या व्यक्तिरेखा एक प्रकारे गीत संगीताच्या माध्यमातून एकमेकांशी बोलतात. संगीत नाटकासारखा हा काहीसा संगीत चित्रपट होता. हा तसा धाडसी प्रयोग होता. पण रसिकांना पसंत पडला.

चित्रकार एम.एफ. हुसेन यांनी 'हम आपके...' तब्बल चाळीस वेळा पाहिला आणि माधुरी दीक्षित ओपन बॅक चोलीमध्ये नखशिखांत सेक्सी दिसते असे एका मुलाखतीत म्हटले आणि ही गोष्ट अशी काही गाजली की चित्रपट पुन्हा चर्चेत राहिला. त्यांना 'माधुरी फिदा हुसेन' असे म्हटले जाऊ लागले.

या चित्रपटाची क्रेझ आता समाजात दिसू लागली. अनेक लग्न सोहळ्यात नवरा मुलाची चप्पल लपवायचा हुकमी क्षण आला. लग्नाचे बजेट वाढले. गीत संगीत व नृत्य रूजले. आपलेही लग्न 'हम आपके...'सारखा इव्हेन्टस असावा अशी सामाजिक मानसिकता वाढली. एक लोकप्रिय चित्रपट समाजात असा मुरत गेला तसेच युवतींमध्ये ओपन बॅक चोलीची आवड निर्माण झाली. मध्यमवर्गीय कुटुंबातील युवतींनीही हळूहळू आपली भिड चेपली. भारतीय संस्कृतीत लग्न हा महत्वाचा घटक, पण 'हम आपके...'पासून त्याला ग्लॅमर आले. सगळ्या लग्नात दीदी तेरा देवर... गाणे मस्ट झाले. आता या चित्रपटाची वेगळी दखल घेतली जाऊ लागली.

'हम आपके...' विदेशात मोठ्या प्रमाणात रिलीज झालेला पहिला चित्रपट होय. विदेशात राहणारा अनिवासी भारतीयांना हा चित्रपट रूचला. त्यात त्यांना आपली लग्न संस्कृती दिसली.

चित्रपट सुपर हिट झाल्यावर मात्र माधुरीपासून संगीतकार राम लक्ष्मणपर्यंत सगळे मुलाखती देऊ लागले. 'हम आपके...'च्या यशाने माधुरीचे नंबर वनचे स्थान भक्कम झाले. याच भूमिकेसाठी तिला फिल्म फेअर अवॉर्डस मिळाले. या सहकुटुंब सहपरिवार एन्जॉय केलेल्या (राजश्री प्रॉडक्सन्सच्या चित्रपटांचे ते दीर्घकालीन खास वैशिष्ट्य) चित्रपटाची हसत खेळत नाचत रंगलेली आणि अगदी अखेरीस नाट्य निर्माण झालेली गोष्ट तुम्हाला माहीत असल्याने येथे पुन्हा सांगायची गरज नाही. खुद्द त्यातील कलाकारांना मात्र तेव्हाच्या शूटिंगच्या वेळचे अनुभव/आठवणी/किस्से आजही अगदी जसेच्या तसे आठवतात. हे सगळेच त्यांना कालपरवाच घडलयं असे वाटते हेदेखील या चित्रपटाचे यश आहे... यशस्वी चित्रपटाची हीच तर गंमत असते, ते कधीच कालबाह्य होत नाहीत.

'हम आपके...'च्या बाबतीत तर असे आहे की आज उद्योगपती घराणे, स्टार क्रिकेटपटू, सेलिब्रिटीज कलाकार यांच्या प्रचंड श्रीमंतीचे लाईव्ह दर्शन घडवणारी लग्ने म्हणजे याच 'हम आपके...'ने जे खोलवर रुजवले त्याचे गोडधोड फळ आहे. ते पाहतानाच 'हम आपके...' आठवतो, तर मग आणखी काय हवे?

---


# शेतकऱ्यांच्या सशक्तीकरणासाठी मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना

जागतिक हवामानातील बदल आणि पर्जन्यमानातील अनियमितेमुळे राज्यातील कृषी व्यवसायावर होणाऱ्या विपरीत परिणामापासून शेतकरी बांधवांना वाचविण्यासाठी राज्य शासन सदैव प्रयत्नशील व कटिबद्ध आहे. याच अनुषंगाने शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी राज्य शासनाने २५ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना अमलात आणली गेली आहे.

महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना रात्रीच्या वेळी १०/८ तास किंवा दिवसा ८ तास थ्री फेज विजेची उपलब्धता चक्राकार पद्धतीने करण्यात येते. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीज बिलाचा भार उचलण्यासाठी शासनाने राज्यातील ४४ लाख तीन हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णतः मोफत वीज पुरवली जाणार आहे. यासाठी साधारण १४ हजार ७६० कोटी रुपये अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

योजनेचा कालावधी : ही योजना पाच वर्षांसाठी म्हणजेच एप्रिल २०२४ ते मार्च २०२९पर्यंत राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे, परंतु तीन वर्षांच्या कालावधीनंतर या योजनेचा आढावा घेऊन पुढील कालावधीत योजना राबविण्याबाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

पात्रता : राज्यातील ७.५ अश्वशक्ती पर्यंत शेतीपंपाचा मंजूर भार असलेले सर्व शेतीपंप ग्राहक या योजनेचा लाभ घेण्यास



पात्र राहतील.

योजनेची अंमलबजावणी : एप्रिल २०२४पासून ७.५ अश्वशक्ती पर्यंतच्या शेतीपंप ग्राहकांना मोफत वीज मिळणार आहे. शासनास विद्युत अधिनियम २००३, कलम ६५ अन्वये कोणत्याही ग्राहकांना अथवा ग्राहक वर्गवारीला अनुदान देऊन त्यानुसार अनुदानित वीज दर लागू करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यानुसार वीज बिल माफ केल्यानंतर या वीजदर सवलतीपोटी रक्कम शासनाकडून महावितरण कंपनीला अग्रीम स्वरुपात वर्ग करण्यात येईल. सध्या देण्यात येणारी वीजदर सवलत रुपये सहा हजार ९८५ कोटी अधिक वीज बिल माफीनुसार सवलत रुपये सात हजार ७७५ कोटी असे वार्षिक वीजदर सवलती पोटी प्रतिवर्षी रु. १४ हजार ७६० कोटी शासनाकडून महावितरण कंपनीला अदा करण्यात येणार आहेत. या रकमेमध्ये योजना कालावधीत बदल झाल्यास त्याप्रमाणे महावितरण कंपनीस शासनाकडून रक्कम वर्ग करण्यात येईल तसेच मागेल त्याला सौर कृषीपंप देण्याचे धोरणदेखील शासनाकडून ठरविण्यात आले आहे. ही योजना राबविण्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण कंपनीची आहे.

**–रायगड जिल्हा माहिती कार्यालय**



# रोहा बसस्थानकाची दुरवस्था





स्थानक गळके, आवारात खड्डे

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा बसस्थानकाचे दुरवस्था झाल्याचे दिसून येत आहे. बसस्थानकाच्या आवारात खड्ड्यात खड्डे पडले आहेत. त्यामुळे प्रवाशांसह बसचालकाला त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. दुसरी बसस्थानक गळत आहे. या बसस्थानकाकडे राज्य परिवहन महामंडळाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या रोहा बसस्थानकाची आज दुरवस्था झाल्याचे दिसून येत आहे. कोकणातील खासगीकरणातून बांधलेल्या रोहा बसस्थानकाची अवस्था बिकट झाली आहे. तालुक्याचे महत्त्वाचे ठिकाण असल्याने नेहमीच या बसस्थानकात वर्दळ व गर्दी असते. शालेय विद्यार्थी, शासकीय काम, प्रवाशांना विविध शहरात जाण्यासाठी व ग्रामीण भागात जाण्यासाठी या बसस्थानकाचा उपयोग होत असतो. आता पावसाळा सुरू असून या बसस्थानकातील छप्पर गळत आहे. सातत्याने पाण्याचा अभिषेक प्रवाशांवर होताना दिसत आहे. संपूर्ण बसस्थानकातील परिसर पाणी झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे बसस्थानकात प्रवाशांना कुठे उभे राहावं व कुठे बसावे हा प्रश्न प्रवाशांना पडत आहे.

रोहा बसस्थानकात ज्या ठिकाणी बसेस उभे राहतात त्या आवारात मोठ मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे येणारे बस खड्ड्यात गेल्यांने खाली वर होता दिसत आहे. दुसरीकडे या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने बस आल्यावर हे पाणी प्रवासाच्या अंगावर उडताना दिसत आहे. या परिसरात मोठमोठे खड्डे पडले आहेत.

या बसस्थानकातील दुचाकी व चारचाकीचा अवैध पार्किंगचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर येताना दिसत आहे. परंतु या पार्कीकचा त्रास बस अवारात आणत असताना बस चालकांना होताना दिसत आहे.

रोहा बसस्थानकाचे दुरवस्था झाली असून या बसस्थानकाची देखभाल कोणी करायचा हा प्रश्न मात्र अधांतरित आहे. खाजगीकरणातून बांधून झाल्यावर ते राज्य परिवहन महामंडळाच्या ताब्यात देण्यात आले, परंतु या बसस्थानकातील दुरवस्थेकडे परिवहन महामंडळाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

## माथेरानची वीज समस्या लागणार मार्गी

**माथेरान : प्रतिनिधी**

अनेक महिन्यापासून माथेरान या पर्यटनस्थळी विजेची समस्या जटिल होती. ती समस्या मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. माथेरान करांच्या मागणीला आमदार महेंद्र थोरवे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आमदार निधीतून विजेचे साहित्य मंजूर करण्यात आले असल्याने सांगितले. यामुळे माथेरानकरांची अति महत्वाची समस्या संपुष्टात येणार आहे.

माथेरान हे गिरीशिखरावर वसलेले जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असून नेरळ-माथेरान या ७ किलोमीटर अंतरावरून घाटरस्ता तसेच जंगलातून वीज वाहिन्या खांब टाकले आहेत. जोरदार पाऊस तसेच वादळीवारा यामुळे वीज प्रवाह वारंवार खंडित होऊन याचा परिणाम येथील पर्यटनावर होत असतो. नगरपालिकेकडून पथदिवे यावर काम केले जाते. बायोगॅस वर पथदिवे उजळले जातात पण महात्मा गांधी रस्त्याच्या अर्धवट मार्गावर उजळल्या जातात मात्र इंदिरा



गांधी नगर ते माथेरानचे प्रवेशद्वार इथं पर्यंत अंधाराचे साम्राज्य आहे.एकही विजेचा प्रकाश उजळला जात नाही त्याचा नाहक त्रास येथे येणाऱ्या पर्यटकांवर होत आहे. याबाबत येथील नागरिकांनीही थेट नाराजी प्रकट केली होती.

एमएमआरडीएकडून महात्मा गांधी रस्त्यावर वीज वाहिन्यांचे नवीन काम केले आहे, पण तेसुद्धा व्यवस्थित उजळत नसल्याबाबत येथील दुकानदारांनी तीव्र संताप व्यक्त केला. म्हणूनच या गंभीर समस्येचे निवारण करण्यासाठी माथेरानकरांनी आमदारांना साकडे घातले होते आणि यावर निवेदन तयार करून आमदारांना दिले होते.आमदार थोरवे यांनी सकारात्मकता दाखवत तात्काळ आमदार निधीतून दोन ट्रान्सफार्मर, ५० विजेचे नवीन पोल व २० किलोमीटर केबल हे साहित्य मंजूर केले असल्याने यापूढे विजेची समस्या मार्गी लागण्याची चिन्हे आहेत.

**वारंवार घरातील वीजपुरवठा खंडित होत आहे. तसेच पथदिवेही बंद अवस्थेत आहेत याचे खापर एमएमआरडीए आणि नगरपालिका एकमेकांवर ढकलून उंदीर मांजराचा खेळ करत आहेत.पण याचा विपरीत परिणाम माथेरानच्या पर्यटनावर होत आहे.याची तक्रार आमदारांकडे केली होती त्यांनी ही समस्या मार्गी लावल्यामुळे पर्यटकांना व नागरिकांना या समस्येपासून मुक्ती मिळणार आहे.**

**-केतन रामाणे, स्थानिक, नागरिक**

## खोपोलीत औषध व धूर फवारणी

**खोपोली : प्रतिनिधी**

नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक डॉ. पंकज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपमुख्याधिकारी गौतम भगले यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाने शहराच्या विविध भागात औषध व धूर फवारणी केली.

शहराच्या विविध भागातील नागरिकांच्या आलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभाग अलर्ट झाला आहे. वर्धमान विहार, मुकुंद नगर, सहकारनगर भांनवजगाव, चिन्मय नगर, वृद्धांवन नगर, जैसल ग्रीन, चंदन पार्क, संभाजीनगर एरिया इत्यादी सह अनेक भागात औषध फवारणी व धूर फवारणी करण्यात आली.

या वेळी माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते संदीप पाटील, उपस्थित होते, अशी माहिती आरोग्य विभागाचे पर्यवेक्षक अतुल घोडके



यांनी दिली. खोपोली नगरपालिका हद्दीतील लवेज गावातही स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

## माणगावमध्ये मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना कार्यक्रम

**माणगाव : प्रतिनिधी**

महसूल व वन विभागाकडील शासन निर्णयानुसार महसूल विभागामार्फत राज्यात सर्वत्र महसूल पंधरवडा २०२४ कार्यक्रम १ ते १५ ऑगस्ट दरम्यान साजरा करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत. यगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली व माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी संदीपान सानप यांच्या सूचनेनुसार माणगाव तहसील कार्यालय येथेही या पंधरवड्याचा शुभारंभ करण्यात आला. त्यानुसार शुक्रवारी (दि.२) माणगाव तहसील कार्यालय येथे माणगाव तालुक्याचे उपविभागीय अधिकारी संदीपान सानप यांच्या सूचनेनुसार व अध्यक्षतेखाली तसेच माणगाव तहसीलदार विकास गारुडकर यांच्या विशेष प्रयत्नाने मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजना शिबिर उत्साहात झाले.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभाग अंतर्गत राबवण्यात येणाऱ्या महसूल पंधरवड्यामध्ये २ ऑगस्ट २०२४ रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना हा उपक्रम तहसील कार्यालय माणगावच्या सभागृहामध्ये राबविण्यात आला. या वेळी माणगाव तालुक्यातील युवांसाठी विविध प्रकारच्या रोजगार संधी आणि तांत्रिक प्रशिक्षण याबाबत जिल्हा नियोजन समिती रायगडचे सदस्य व जेसन पॉलिमर कंपनीचे प्रमुख लक्ष्मण नारायण जाधव, पॉस्को महाराष्ट्र कंपनीचे प्रशिक्षण तज्ञ सागर पोळ व टिकमभाई मेथा वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य हर्षल जोशी यांचे मार्गदर्शन सत्र ठेवण्यात आलेले होते. या वेळी माणगाव उपविभागाचे उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप, माणगाव तहसील कार्यालयाचे तहसीलदार विकास गारुडकर तसेच माणगाव तहसीलकार्यालयातील सर्व नायब तहसीलदार व इतर अधिकारी व कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

माणगाव तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालयांमधील १५० विध्यार्थी या प्रशिक्षण सत्रासाठी उपस्थित होते. माणगाव तालुक्यात परिविक्षाधीन तलाठी म्हणून कार्यरत असलेले केदार संजय पाटील यांची नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये पोलीस उपनिरीक्षक या पदावर निवड झालेली असल्याने त्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अनुषंगाने उपस्थित युवकांना केदार पाटील यांनी त्यांचा प्रेरणादायी प्रवास उलगडून सांगितला. महसूल दिनानिमित्त अशा प्रकारच्या मार्गदर्शनाचा युवकांना लाभ मिळाल्याबाबत युवकांनी आभार व्यक्त केला.

## चंपावती ग्रामीण बिगरशेती पतसंस्थेची वार्षिक सभा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा येथील चंपावती ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्थेची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी (दि. १०) आयोजित करण्यात आले आहे.

चौल सागमळा येथील पाठारे क्षत्रिय सभागृह येथे दुपारी ठिक २.३० वाजता पतसंस्थेचे अध्यक्ष विश्वास जोशी यांचे अध्यक्षतेखाली सर्व संचालक मंडळ व सभासदाच्या उपस्थितीत घेण्यात येणार आहे असे पतसंस्थेचे सचिव उल्हास काशिराम तुरकर यांनी प्रसिध्दीसाठी कळविले आहे.

या सभेत मागील सभा शनिवार १९ ऑगस्ट २०२३च्या सभेचे इतिवृत्तात वाचन करणे, १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४चा वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफातोटा पत्रकांस मान्यता देणे, कायदा व नियम यांना अनुसरून नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे तसेच सन २०२३-२०२४ या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे, सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षणाकरीता पॅनेलवरील लेखा परिक्षकांची निवड करणे आदींसह आयत्यावेळेचे विषयांचा विचार करणे आदी कामे विचारात घेण्यात येणार आहेत.

## माथेरानमध्ये मागील वर्षीच्या तुलनेत कमी पाऊस

**माथेरान : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस पडणारे उंच गिरी शिखरावरील पर्यटनस्थळ असलेल्या माथेरान मध्ये मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी ५८९ मिलिमीटर इतका कमी पाऊस झाला आहे.यावर्षी जरी जोरदार पाऊस झाला असला तरी एकही दिवस ३०० मिलिमीटर पाऊस झाला नाही. तरीसुद्धा या दमदार पाऊसामुळे येथे पर्यटनासाठी आलेला पर्यटक मात्र सुखावला आहे.

समुद्र सपाटीपासून २६३६ फूट उंचीवर असलेल्या माथेरान पर्यटनस्थळी जोरदार पाऊस पडतो हे सर्वश्रुत आहे. दरवर्षी येथे सरासरी २०० इंच इतका पाऊस पडतो. मागील वर्षीदेखील जोरदार पाऊस झाला होता. जुलै महिन्यात तर सर्वाधिक पाऊस येथे पडतो मात्र यावेळी मागील वर्षीपेक्षा तब्बल




५८९ मिलिमिटर कमी पाऊस झाला आहे.जुलै २०२३ मध्ये ३०० मिलिमीटर पेक्षा जास्त पाऊस दोन वेळा झाला होता.१९ जुलै २०२३ ला ३४२ मिलिमीटर तर २० जुलै २०२३ ला ३९८ मिलिमीटर पाऊसाची नोंद झाली होती.मात्र यावर्षी एकदाही ३०० मिलिमीटरचा टप्पा पावसाने गाठला नाही.

उंच गिरीशिखरवर असलेल्या माथेरान मध्ये पावसाचा वेग पाहता जोरदार पाऊस होईल असे वाटत असताना पाऊस मात्र कमी झाला आहे. असे असताना देखील येथे येणाऱ्या पर्यटकांच्या आनंदात कमी झालेली दिसून आली नाही,पर्यटकांचा ओघ वाढतच असून जोरदार पावसात पर्यटक येथील वर्षा पर्यटनाचा आनंद घेत आहेत. कमी पाऊस पडूनही हिरव्या, काळ्या डोंगरावरून सफेद वाहणारे झरे, कधी दाट धुके तर कधी तुरळक धुक्याचे वलय यामुळे निसर्ग खुलून दिसत असताना हे अद्भुत दृश्य पाहताना पर्यटक मनसोक्त भटकंती करत आहेत.

**माथेरानमध्ये जून आणि जुलै महिन्यात दमदार पाऊस झाला पण मागच्या वर्षाच्या तुलनेत कमी असून ५८९ मिलिमीटर पाऊस कमी पडला आहे. यावर्षी सरीवर सरी बरसत आहेत. पाऊस लागून न राहता थांबून येत आहे.**

**-अन्सार शेख, पर्जन्यमापक निरीक्षक**

**माथेरान आमच्यासाठी नवीन नाही. आम्ही खूप वेळा माथेरान मध्ये येतो. माथेरानचा पावसाळी निसर्ग मनाला आल्हाददायकवाटतो.येथील वातावरण वेगळे असल्यामुळे फिरण्यास खूप मजा येते खास करून तर पावसात. येथील पाऊस सरींवर असल्यामुळे फिरण्यासही मजा येत आहे.**

**-विनायक परब, पर्यटक, मुंबई**


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसे खरेदीखत ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे - सांगुर्ली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट / सर्व्हे नंबर | उपविभाग/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ३३ | ४ | जिरायत ०-०४-६०<br>पो.ख. ०-०१-५०<br>एकूण ०-०६-१० | ०.३७ | १) शांती नारयण ठोकळ,<br>२) श्री. मारूती चाहु केदारी. |

पनवेल.
दिनांक ०३/०८/२०२४

सही/-
अॅड. जयवंत एकनाथ भोपी
अॅडव्होकेट
शॉप नं. १३, साई साज सोसायटी, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.


## मुरूडमध्ये संत नामदेव समाधी सोहळा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शिंपी समाजातर्फे संत नामदेव महाराजांचा समाधी सोहळा धार्मिक पद्धतीने साजरा करण्यात आला. या वेळी समाजाचे अध्यक्ष विजय करंबे दाम्पत्याचे हस्ते संत नामदेव प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर समाजाच्या महिला मंडळाकडून संत नामदेवांचे अभंग गाऊन आनंद साजरा केला.

८५ वर्षांच्या रोहिणी नाझरे यांनी विठ्ठलाचे भजन गायन करून सहभाग नोंदविला. ग्यानबा तुकारामाचा जयघोष करीत या धार्मिक सोहळ्यात समाजबांधवांनी सहभागी होत महाप्रसादाचा लाभ घेतला.

या वेळी सुरेश सद्रे, गौरव हणमंते, सिद्धेश करंबे, सौरभ नाझरे, संतोष लाखामदे, सिद्धेश लखमदे, राजेंद्र कजबजे, दर्शन काळबेरे, प्रज्ञा सदरे, प्रतिभा बागडे, वैशाली लखमदे, राजश्री सद्रे, गीता सुकाळे, निमा नाझरे, उमा बागडे, महिला मंडळ अध्यक्ष सुनीता करंबे, शोभा राऊत, वनारसे, अश्विनी करंबे, उमा बागडे, रोहिणी नाझरे, अरुण बागडे, विजय करंबे, सिद्धेश करंबे, आशिष बागडे आदींसह समाजबांधव उपस्थित होते.



## सुरक्षारक्षकाचा प्रामाणिकपणा

**खोपोली : प्रतिनिधी**

तरुणाचा महागडा मोबाईल प्रामाणिक सुरक्षारक्षकामुळे मालकला परत मिळाला.

शनिवारी मुंबईहून चौक परिसरात गटारी साजरी करण्यासाठी मुंबईतील तरुण मोठ्या संख्येने आले होते. चौक फाटा येथील हॉटेलमध्ये नाश्तासाठी थांबलेल्या संदीप खोटे या तरुणाचा मोबाईल वाहनतळ परिसरात पडला. सुरक्षारक्षक श्रीकांत सिंग याला मोबाईल सापडल्यावर त्याने मोबाईल जवळ असलेल्या माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यांच्या ऑफिसमध्ये जमा केला.

ऑफिसमधील नामदेव यांनी मोबाईलवर आलेल्या कॉलवर मोबाईल सुरक्षित असून ऑफिसमधून घेऊन जाण्यास सांगितले. मोबाईल मूळमालकाची ओळख पटवून परत करण्यात आला. सुरक्षारक्षकाच्या प्रामाणिकपणाचे कौतुक होत आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली स्थावर मिळकत आमचे अशिल १) श्री. विजय किसन वावा, २) सौ. रिया विजय वावा, ३) श्री. मुकेश शिवजी राठी, ४) सौ. कल्पना मुकेश राठी, ५) श्री. वैभव चंद्रहार विभुते, ६) सौ. निलम वैभव विभुते, ७) श्री. संजय हाशा गवळी, ८) सौ. जयश्री संजय गवळी, यांनी सदर स्थावर मिळकतीचे मूळ मालक श्री. सुनिल पन्नालाल बांठीया, यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे तसेच या स्थावर मिळकतीवर कोणाचा काही तावाकब्जा किवा काही अधिकार असल्यास कळविण्याकरीता जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे ठरविले आहे.

**:- मिळकतीचे वर्णन -:**

मौजे - पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड, येथील आदर्श को.ऑप. हौ. सोसायटी, भुखंड क्र. २७, क्षेत्र ४५६.५० चौ.मी., सव्हे नं. ४७३/अ/१, ४७३/अ/२, ४७३/३/३, ४७८/१, ४७८/२, ४७८/३, ४७८/४, ४७८/५, ४७८/६, ४७८/७, ४७८/८, ४७८/९, आणि, टी.पी.एस. प्रॉपर्टी नं. २३२, २३३अ व २३३ब, अंतिम भूखंड क्र. ३० पनवेल महानगरपालिका हद्दीतील व सब रजिस्ट्रार साहेब पनवेल, जि रायगड यांचे अधिकारक्षेत्रातील स्थावर मिळकत

सदरहू स्थावर मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, एम.आ.यू. साठेकरार, वारसाहक्क, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, विकास करार, भूधारक हक्क, मृत्यूपत्र, लीज/भाडेपट्टा, लीन, पोटगी हक्क अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदर स्थावर मिळकतीचा खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील व आमचे अशिल सदर मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक ०१/०८/२०२४

सही/-
(प्राजक्ता निलेश पाटील)
वकील.

पत्ता: ऑफिस नं. १२, यशोकिरण को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड फोन नं. ९९६७९१२५४१



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसे खरेदीखत ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे - सांगुर्ली, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| गट / सर्व्हे नंबर | उपविभाग/ हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू. पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १२ | १/ब/१/ अ/२ | जिरायत ०-६६-१०<br>पो.ख. ०-०८- ९०<br>एकूण ०-७५-०० | १४.७५ | १) श्री. पदमाकर अर्जुन देशमुख,<br>२) कपीला अर्जुन देशमुख,<br>३) लता दशरथ देशमुख,<br>४) विमल अर्जुन देशमुख,<br>५) शिल्पा महेश देशमुख,<br>६) मिताली रामकृष्ण इंदलकर,<br>७) श्री. अभिजीत महेश देशमुख,<br>८) शालिनी वासुदेव देशमुख,<br>९) तृप्ती वासुदेव देशमुख,<br>१०) कुणाल वासुदेव देशमुख |

पनवेल.
दिनांक ०३/०८/२०२४

सही/-
अॅड. जयवंत एकनाथ भोपी
अॅडव्होकेट
शॉप नं. १३, साई साज सोसायटी, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

# उरणमध्ये पालिकेने साकारला वायुवरील शवदाहिनी प्रकल्प

## वेळ, पैशाचीही होणार बचत

**उरण : वार्ताहर**

उरण परिसरातील पहिलाच वायुवरील शवदाहिनी प्रकल्प उरण नगर परिषदेकडून उभारण्यात आला आहे. उरण नगर परिषदेने शहरातील बोरी येथे उभारलेल्या एक कोटी खर्चाच्या प्रकल्पामुळे नागरिकांचा वेळ, पैशाचीही मोठ्या प्रमाणावर बचत होणार असून पर्यावरणाचे रक्षण व प्रदुषणाला पर्याय ठरणार आहे.

उरण शहरवासीयांसाठी पर्यावरणपूरक वायुवर चालणारी शवदाहिनी बोरी स्मशानभूमीत उभारण्यात आली आहे. सुमारे एक कोटी रुपये खर्च करून उभारलेला वायुवर आधारित शवदाहिनी प्रकल्प लाकडांवर जळीत करण्यामुळे होणाऱ्या मोठ्या प्रमाणावर प्रदुषणाला पर्याय ठरणारा आहे. त्याशिवाय नाममात्र दराच्या आकारणीमुळे वेळ, पैशाचीही मोठ्या प्रमाणावर बचत होणार असुन परिसरातील हा पहिलाच प्रकल्प आहे.



उरण शहराची लोकसंख्या ३५ हजारांहून अधिक आहे. त्यातच परिसरातील वाढत्या औद्योगिक पसाऱ्यामुळे लोकसंख्येत वाढ होत चालली आहे. त्यामुळे वाढत्या वाहतुकीमुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. अपघातातील आणि बेवारस मृतदेहाच्या दहनाचा ताणही उनपला सोसावा लागत आहे. तशी शहरातील लोकसंख्येच्या तुलनेत शहरात बोरी, भवरा, मोरा अशी तीन ठिकाणी स्मशानभूमीची व्यवस्था आहे. दररोज रात्री- अपरात्री मृतदेहांचे दहन करण्यासाठी स्मशानभूमीत येणाऱ्या मृतदेहांची विल्हेवाट लावण्यासाठी मृतांच्या नातेवाईकांना लाकूडफाटा उपलब्ध करून देण्याचे काम उनपला करावे लागते.

सध्याच्या प्रचलित पद्धतीनुसार अंत्यविधीसाठी कमीत कमी ५०० ते ७५० किलो लाकूडफाटा लागते. यासाठी साधारणपणे पाच हजारांहून अधिक खर्च करावा लागतो. त्याशिवाय मृतदेहांची राख होईपर्यंत नातेवाईकांसह आलेल्या आप्तेष्टांना नाहक तीन-चार तास अंत्यसंस्कारासाठी ताटकळत स्मशानभूमीतच बसावे लागते. यामुळे मृतांच्या नातेवाईकांना नाहक खर्चाच्या तसेच नाहक वाया जाणाऱ्या वेळेच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याने मनस्तापही सहन करावा लागतो.

उनपच्या या शवदाहिनीमुळे नागरिकांचा त्रास कमी होण्यास मदत मिळणार आहे. उरण शहरातील स्मशानभूमीमध्येही गॅस शवदाहिनी उभारण्यात आली असल्याची माहिती उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांनी दिली.

**नगरोत्थान महाअभियान योजनेंतर्गत उपक्रम**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत निधीतून पर्यावरणपूरक गॅस शवदाहिनी उभारण्यात आली आहे. पर्यावरणाचे रक्षण, प्रदुषणाला पर्याय ठरणारी गॅस शवदाहिनी सामान्य नागरिकांच्या खर्चाच्याच नव्हे तर वेळेची बचत करण्यासाठीही उपयुक्त ठरणार आहे. साधारणता हजार, पंधराशे रुपये इतक्या नाममात्र दरात शवदाहिनी प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहे. महानगर गॅस कंपनीकडून वायु पुरवठा करण्यात येणार आहे. लवकरच डमी ट्रायल घेऊन टेस्टींग करण्यात येणार आहे, अशी माहिती उनपचे नगर अभियंता निखिल ढोरे यांनी सांगितले.

# पनवेल उपजिल्हा रुग्णालयाचे प्रवेशद्वार दुसऱ्या बाजूने होणार सुरू

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेनेने पनवेलच्या उपजिल्हा रुग्णालयाचे प्रवेशद्वार दुसऱ्या बाजूने सुरू करण्याबाबत मागणी करताच रुग्णालय प्रशासनाने त्वरित मागणी मान्य करत हॉस्पिटलच्या मुख्य दरवाज्याचा आणि भविष्यात पलीकडच्या बाजूकडून प्रशस्त प्रवेशद्वार सुरू करण्यास मान्यता दिली आहे.

सध्याचे पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयाचे आताचे प्रवेशद्वार हे ज्येष्ठ नागरिक संघ सभागृहाकडे जाणाऱ्या रस्त्यावर उघडते तिथे प्रत्यक्षात आठ ते दहा मोठ्या रहिवासी इमारती असून रुग्णालय परिसरात होणारी रुग्णांची, नातेवाईकांची गर्दी, पोलीस, ॲम्बुलन्स, रिक्षा यांचे होणारे ट्रॅफिक, अनेक गुन्ह्यांमधील गुन्हेगार किंवा मयत झालेल्या लोकांचे पोस्टमार्टम इत्यादीमुळे या परिसरात प्रचंड वाहतूक कोंडी, भांडण तंटे यामुळे रहिवाशांना भीतीचे वातावरण निर्माण होते. लोकसभा प्रचारादरम्यान शिवसेनेचे महानगरप्रमुख तथा माजी नगरसेवक प्रथमेश



चंद्रशेखर सोमण यांच्या ही गोष्ट रहिवाशांनी लक्षात आणून दिली. त्यानुसा प्रथमेश सोमण यांच्या नेतृत्वात शिवसेना पदाधिकार्यांनी जिल्ह्याचे सिव्हिल सर्जन अंबादास देवमाने व रुग्णालय अधीक्षक बालाजी फाळके यांची भेट घेऊन रुग्णालयाचे प्रवेशद्वार पलीकडच्या निर्जन रस्त्यावरून करण्याची मागणी केली. तात्पुरत्या स्वरूपात अस्तित्वात असलेल्या मुख्य रस्त्यावरील गेटचा वापर करण्याची ही सूचना दिली. त्यानुसार त्वरित कारवाई करत रहिवाशांना गैरसोय होणारे प्रवेशद्वार दोन-तीन दिवसांत बंद करून मुख्य प्रवेशद्वाराच्या वापर करण्याच्या सूचना देवमाने यांनी रुग्णालय प्रशासनाला दिल्या व दिवसातील काहीच तास किंवा गरज पडेल तेव्हाच ज्येष्ठ नागरिक संघ पथवरील प्रवेशद्वार उघडण्याबाबत सांगितले व लवकरच सार्वजनिक बांधकाम खात्याकडून निर्जन रस्त्यावरून नवीन गेट तयार करून तिथून कायमस्वरूपी एंट्रन्स करण्याचे ही मान्य केले. सोसायटी सदस्यांची ही या संदर्भात एक बैठक घेऊन त्यांच्या सूचना घेण्यात आल्या. अतिशय त्वरित या विषयाचा निकाल दिल्यामुळे जनतेने शिवसेनेचे आभार मानले.




**पनवेल : मातंग चेतना परिषद, उलवे नोडच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०४व्या जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सेक्टर १७, शेलघर समाजमंदिरात झालेल्या या कार्यक्रमाला वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे यांची उपस्थिती लाभली. या वेळी त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले.**



**नवीन पनवेल : चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयात दीप पूजनाचा कार्यक्रम उत्साहात साजरा केला. या वेळी मराठी पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये १९ ऑगस्टला पत्रकार संवाद रॅली

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पत्रकार हे खऱ्या अर्थाने लोकशाहीचा डीएनएफ आहेत, पत्रकारांचे स्वतःचे प्रश्न निर्माण झाले आहेत, परंतु लोकांचा आवाज बनून त्यांचे प्रश्न चव्हाट्यावर आणण्याचे काम करणाऱ्या पत्रकारांना दुर्देवाने स्वतःचे प्रश्न मांडता येत नाहीत. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारांच्या प्रश्नावर शासन दरबारी आवाज उठवून पाठपुरावा करत असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. ही रॅली पनवेलमध्ये १९ ऑगस्ट रोजी




दाखल होणार असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

दीक्षाभूमीवरून निघालेली पत्रकार संवाद रॅली सेवाग्राम, अमरावती मार्गे मंगळवारी अकोल्यात पोहचल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पनवेल शहरात १९ ऑगस्टला संपूर्ण शहरात रॅली फिरणार असून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पत्रकार परिषद होणार आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारांच्या प्रश्नावर शासन दरबारी आवाज उठवून पाठपुरावा करत आहे. काही प्रश्न सोडवण्यात पत्रकार संघाला यश आले असले तरी महत्त्वाचे प्रश्न सुटलेले नसल्याचे त्यांनी सांगितले. विविध घटकांसाठी काही लाख कोटींच्या योजना सरकारने जाहीर केल्या आहेत, परंतु पत्रकारांसाठी कोणतीच योजना नाही. त्याला घरकुल मिळत नाही. बँकांचे कर्जदेखील मिळत नाही. आधी स्वीकृती दिली जाते, परंतु पत्रकारांची संख्या हजार असेल तर केवळ दहा-वीस जणांना अधिस्वीकृती मिळते. कारण अधिस्वीकृती मिळवण्याचे नियम आणि अटी खूपच जाचक आहेत. बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेचे पेंडिंग ठेवलेले प्रस्ताव तत्काळ मंजूर करावेत. जेणेकरून वयाची साठी ओलांडलेल्या ज्येष्ठ पत्रकारांचा खऱ्या अर्थाने सन्मान होईल.

यासह पत्रकारांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने महामानव बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेली दीक्षाभूमी ते मंत्रालय अशी पत्रकार संवाद रॅली काढली आहे. या वेळी सरचिटणीस विश्वासराव आरोटे, प्रवीण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर उपस्थित होते.

# पनवेलचे प्रशासकीय भवन ऑगस्टअखेर सेवेत

**पनवेल : वार्ताहर**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यातून साकारत असलेल्या पनवेलच्या प्रशासकीय भवनामध्ये सरकारी कारभार सुरू करण्याच्या जोरदार हालचाली सुरू आहेत. या भवनाच्या नवीन इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. इमारतीच्या तळमजल्याखाली वाहनतळाचे नियोजन केले असले तरी येथील काम अपूर्ण आहे. त्यामुळे प्रशासकीय भवनाचे बांधकाम १० वर्षांपासून रखडले असून अपूर्ण अवस्थेतील इमारतीचे काम पूर्ण करून येथून कारभार सुरू करावा, अशी मागणी केली जात आहे.

२०१४साली पनवेलच्या तहसील कचेरी आणि पोलीस ठाण्याच्या वास्तूंचे स्थलांतर करून नव्याने पनवेलचे प्रशासकीय भवन बांधण्याचे काम प्रत्यक्षात सुरू झाले. कधी जागेचा वाद, तर कधी सरकारी निधीची कमतरता यामुळे हे प्रशासकीय भवनाचे बांधकाम रखडले होते. अजूनही काही महिने या भवनाच्या बांधकामाला लागणार आहेत. सध्या पनवेलचे अप्पर तहसीलदार, पोलीस ठाणे, नोंदणी कार्यालय व कोषागार कार्यालय येथे सुरू करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारतीमध्ये कामे सुरू केली आहेत, परंतु सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर प्रशासकीय भवन सुरू न केल्यास उलट वाहनतळाचे काम अपूर्ण असल्याने या कार्यालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांना त्यांची वाहने रस्त्यावर उभी करावी लागतील. त्यामुळे आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहासमोरील मार्ग व इतर रस्त्यांवर वाहनकोंडीची समस्या उभी राहील.

उर्वरित सर्व कामे पूर्ण करून हे भवन नागरिकांसाठी खुले करावे, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

**सार्वजनिक बांधकाम विभाग क्रांतिदिन किंवा स्वातंत्र्य दिनी पनवेलचे प्रशासकीय भवन सुरू करणार नाही. प्रशासकीय भवनाचे काम अंतिम टप्प्यात आहे. प्रशासकीय भवनाचे वीज, अग्निशमन यंत्रणा, वाहनतळाची स्वच्छता व रंगाचे काम अंतिम टप्प्यात आहे. ऑगस्ट अखेरपर्यंत हे भवन सुरू करण्यासाठी विभाग प्रयत्नशील आहे.**
**-मिलिंद कदम, अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग**

# आपटा येथे विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**रसायनी : प्रतिनिधी**

अल्कली अमाईन लि. पाताळगंगा कंपनीने आपटा येथील प्राथमिक शाळेतील मुलांना वह्यांचे वाटप केले.

शाळेतील सर्व १४५ मुला-मुलींना प्रत्येकी सहापेक्षा जास्त वह्यांचे वाटप कंपनीचे अधिकारी एचआर मॅनेजर अर्चना माने, सेफ्टी ऑफिसर प्रदीप रकटे, एचआर अधिकारी बापू गावडे यांनी वह्यांचे वाटप केले.



यासाठी कंपनीचे रवी ओंकार यांनी पुढाकार घेऊन सीएसआर फंडातून हे काम केले. आपटा येथील पत्रकार बी.एस. कुलकर्णी यांनी याबाबतीत ओंकार यांच्याबरोबर याची माहिती दिली होती व त्यानुसार वह्यावाटप करण्यात आले.

आपटा शाळेच्या मुख्याध्यापिका झेंमसे मॅडम, शिंदे मॅडम, पाटील सर, इरफान सर यांनी या वेळी मदत केली. एक चांगले सामाजिक काम झाले, याबाबत शाळेने कंपनीचे धन्यवाद मानले.







**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खांदा कॉलनीतील सीकेटी उच्च महाविद्यालयात सी.डी. देशमुख स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने भारतीय प्रशासकीय सेवेतील माजी अधिकारी अविनाश धर्माधिकारी यांचे करिअरच्या संधी आणि व्यक्तिमत्व विकास या विषयावर मार्गदर्शन झाले. त्याचबरोबर भव्य रोजगार मेळावा झाला. या भव्य रोजगार मेळाव्यामध्ये १८२८ उमेदवारांनी सहभाग घेतला. या वेळी काही पात्र उमेदवारांना 'ऑन दि स्पॉट अपॉईंटमेंट लेटर' मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.**

# चोरीच्या घटनांना आळा घालण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

कायदेशीर गणरक्षक फौज या संघटनेच्या माध्यमातून माळीवाडी सुकापुर या भागामध्ये वाढत चाललेल्या चोरीच्या गुन्ह्याविरुद्ध व तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी योग्य ती आणि शीघ्र कार्यवाही करण्यात यावी, भविष्यात आता घडत असलेले गुन्हे घडू नयेत म्हणून योग्य त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पालीदेवद - सुकापुर या विभागातील वाढत चाललेली लोकसंख्या चा विचार करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व या विभागामध्ये कायदा व सुव्यवस्था अटळ राहण्यासाठी या विभागामध्ये पोलीस चौकीची स्थापना लवकरात लवकर करण्यात यावी यासाठी खांदेश्वर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक लांडगे यांना निवेदन देण्यात आले. समाजात वाढत चाललेले गुन्हे व त्याला नियंत्रित करण्यासाठीच्या उपाययोजना या विषयावर पोलीस प्रशासनाकडून लवकरात लवकर या विभागामध्ये पोलीस चौकी स्थापन करण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद देण्यात आलेला आहे.



# रायगडातील २८पैकी २४ धरणे भरली

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांत दोन हजार ६२४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. सामान्य पर्जन्यमानाच्या तुलनेत हे प्रमाण ८४ टक्के आहे. समाधानकारक पावसामुळे रायगड जिल्ह्यातील लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारित असलेल्या २८ धरणांपैकी २४ धरणे पूर्ण क्षमतेनी भरली आहेत. उर्वरित चार धरणांमध्येही सरासरीच्या संचय क्षमतेच्या ८० टक्केपेक्षा अधिक पाणीसाठा जमा झाला आहे. महत्त्वाची बाब म्हणजे नवी मुंबई, पनवेल आणि उरण परिसराला पाणीपुरवठा करणारे हेटवणे धरणही ९० टक्के भरले आहे.



जून महिन्याच्या सुरुवातीला कोलाड येथील लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेल्या २८ प्रकल्पात २३ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. यातील नऊ धरणांमध्ये १० टक्क्यांहून कमी पाणीसाठा शिल्लक होता. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील अनेक भागात पाणीटंचाईचे ढग दाटले होते. जून महिन्याच्या २० दिवसांत पावसाने ओढ दिली होती. त्यामुळे पाणी परिस्थिती बिकट झाली होती. अखेर जून महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात जिल्ह्यात पावसाने जोर धरला.

जुलै महिन्यातही पावसाचा जोर वाढला. जुलै महिन्यातील बहुतेक दिवस पावसाळीच होते. पावसाच्या जोरदार महिन्याभरात सतत बरसत होत्या. धरणांच्या क्षेत्रातही चांगल्या पावसाची नोंद झाली. यामुळे कोलाडच्या लघुपाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असलेल्या २८ धरणांपैकी २४ धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत. ६७.४६८ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा या धरणांमध्ये जमा झाला आहे. सुतारवाडी, आंबेघर, कोडगाव, कवेळे, ढोकशेत, घोटवडे, वावा, उन्हेरे, पाभरे, कुडकी, संदेरी, वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे, खैरे, भिलवले, मोरबे, उसरण, फणसाड, श्रीगाव, कोलते–मोकाशी, डोणवत, बामणोली, उसरण ही धरणे पूर्ण क्षमतेने भरली आहेत.

पुनाडे, अवसरे, रानिवली आणि कार्ले ही चार धरणे अद्याप पूर्ण क्षमतेने भरली नसली तरी या चारही धरणात ८० टक्केहून अधिक पाणीसाठा जमा झाला आहे. त्यामुळे रायगडकरांची जलचिंता मिटली आहे. प्रादेशिक हवामान विभागाने रायगड जिल्ह्यासाठी पुढील चार दिवसांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे धरणांच्या पाणीपातळीत अजून वाढ अपेक्षित आहे.

### हेटवणे धरणातही ९० टक्के पाणीसाठा

नवी मुंबई, पेण, उरण आणि पनवेल परिसराला पाणीपुरवठा करणारे पेण तालुक्यातील हेटवणे धरणही ९० टक्के भरले आहे. या धरणाची साठवण क्षमता ५.१२ टिएमसी आहे. धरणात ९० टक्क्यांहून अधिक पाणीसाठा जमा झाला आहे. पावसाचा जोर कायम असल्याने लवकरच हे धरणही पूर्ण भरण्याची शक्यता आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून सहकारी महिलेवर अत्याचार

## अश्लिल फोटो, व्हिडीओ व्हायरल करण्याचीही धमकी

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली महावितरण कार्यालयातील कर्मचाऱ्याने सहकारी महिला कर्मचाऱ्याला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. त्याचप्रमाणे पीडित महिलेला धमकावून त्याच्या मोबाईलमध्ये असलेले अश्लिल फोटो आणि व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देण्यात आली. त्यामुळे पीडितेने पोलिसांकडे धाव घेत अत्याचार करणाऱ्या व बदनामी करण्याची धमकी देणाऱ्याविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.



प्रशांत मारूती मोडक असे या खोपोली महावितरण कार्यालयातील कर्मचाऱ्याचे नाव असून पीडिता आणि प्रशांत वर्षभरापासून एकमेकांना ओळखत होते. दोघेही खोपोली महावितरण कार्यालयात कामाला होते. प्रशांतने आधी तिच्याशी लगट करून संपर्क वाढवला. नंतर तिला वारंवार लग्नाचे अमिष दाखवून लोणावळा येथील रिसॉर्ट सिल्वर हिल्स येथे घेऊन गेला आणि ज्युसमध्ये गुंगीचे औषध टाकून तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

पीडितेने लग्नाबाबत विचारणा केल्यावर मात्र टाळाटाळ करत प्रशांतने त्याच्या मोबाईलमध्ये असलेले तिचे विवस्त्र फोटो व व्हिडीओ समाजमाध्यमांवर प्रसारित करेन अशी धमकी दिली तसेच तिच्या संपूर्ण कुटुंबाला जीवे मारून टाकेन अशीही धमकी देत लोणावळा येथील वेगवेगळ्या हॉटेलमध्ये नेत जबरदस्तीने अनैसर्गिकपणे शारीरिक संबंध ठेवले.

प्रशांतकडून सातत्याने होणारा अत्याचार असह्य झाल्याने अखेर पीडितेने धैर्य करून कर्जत पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती, पण हा गुन्हा लोणावळा हद्दीत घडला असल्याने तो लोणावळा पोलीस ठाणे येथे वर्ग करून नंतर खोपोली पोलीस ठाण्याकडे पाठविण्यात आला.

याबाबत खोपोली पोलीस ठाणे येथे प्रशांत मोडकविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रोहा भाजपतर्फे उद्या विविध उपक्रम

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यावर आमदार प्रशांत ठाकूर यांचे विशेष प्रेम आहे. गेल्या अनेक वर्षांपासून दादांच्या माध्यमातून व पाठपुराव्यामुळे अनेक गावांतील विकासकामे मार्गी लागली असल्यामुळे त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रोहा तालुका भाजपच्या वतीने सोमवारी (दि. ५) विविध सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. पीएनपी तळाघर



हायस्कूल येथे कलर प्रिंटर व शैक्षणिक साहित्यवाटप, पांडुरंगशास्त्री आठवले धाटाव हायस्कूलमध्ये १८५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, भुवनेश्वर आदिवासीवाडीत विद्यार्थ्यांना छत्रीवाटप, भुवनेश्वर येथे गरजु कुटुंबांना घरघंटी, कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मेहंदळे हायस्कूल येथे २४ कचराकुंड्या, रामभाऊ महादेव वागळे धामणी हायस्कूल येथील १०७ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपचे रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांनी दिली.

# अक्षता, यशश्रीच्या आरोपींवर कठोर कारवाई करा

## आगरी युवासेनेचे पोलिसांना निवेदन

**कर्जत : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील अक्षता म्हात्रे खून प्रकरण आणि उरण येथील यशश्री शिंदे हत्येप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाई व्हावी या मागणीसाठी नेरळ आगरी युवक सेना यांनी नेरळ पोलीस ठाण्यात निवेदन दिले.



अक्षता म्हात्रे यांच्यावर त्या मंदिरात रात्र काढण्यासाठी थांबल्या असता सामूहिक अत्याचार झाला होता. हे प्रकरण ताजे असताना उरणमधील यशश्री शिंदे हिची हत्या झाली. गुन्ह्यात अक्षता म्हात्रे यांच्यावर सामूहिक बलात्कार करून नंतर त्यांची हत्या करण्यात आली, तर यशश्री शिंदे हिची ओळखीतून निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या दोघींच्या मृत्यूमुळे महिलावर्ग असुरक्षित असल्याचे समोर आले आहे. त्यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या आरोपींवर कारवाई व्हावी या मागणीसाठी नेरळमधील आगरी युवक सेनेकडून पोलिसांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली.

आगरी युवक सेनेचे अध्यक्ष ओंकार तरे, केशव तरे व अन्य पदाधिकाऱ्यांनी हे निवेदन पोलिसांना दिले. नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी वरिष्ठांना हे निवेदन पाठवले जाईल, असे या वेळी सांगितले.

# कृषी संशोधन केंद्राच्या सहयोगी संचालकपदी डॉ. बी.डी. वाघमोडे

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सहयोगी संशोधन संचालकपदी वरिष्ठ भात पैदासकार आणि भात विशेषज्ञ डॉ. बी.डी. वाघमोडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



डॉ. एस.बी. भगत हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने ते सांभाळत असलेल्या प्रभारी सहयोगी संशोधन संचालक या पदाचा अतिरिक्त पदभार डॉ. वाघमोडे यांच्याकडे सोपविण्याचे आदेश डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोलीचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या मान्यतेने कुलसचिव डॉ. प्रदीप हळदवणेकर यांनी निर्गमित केले.

डॉ. वाघमोडे हे मागील जवळपास साडेसत्तावीस वर्षांपासून संशोधन, बीजोत्पादन, विस्तार कार्य करीत आहेत. त्यांनी विविध पिकांची २७ वाणं विकसित केली आहेत.संशोधन कार्यातील बहुमूल्य कामगिरीमुळे त्यांना आतापर्यंत २१ प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. भात विशेषज्ञ म्हणून कर्जत येथे रूजू झाल्यापासून त्यांनी त्यांच्या विभागात बऱ्याच सुधारणा घडवून आणल्या तसेच नवे प्रकल्पही सुरू केले आहेत. ते या संशोधन केंद्राचा कायापालट करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या नियुक्तीबद्दल डॉ. एस.बी. भगत, डॉ. रवींद्र मर्दाने, डॉ. नामदेव म्हसकर, डॉ. महेंद्र गवई, डॉ. विजय दामोधर, डॉ. विजय सागवेकर, डॉ. तुषार बेडसे तसेच नामांकित शास्त्रज्ञांनी डॉ. वाघमोडे यांचे अभिनंदन केले.

## महसूल पंधरवड्यानिमित्त १० ऑगस्टला सैनिक हो तुमच्यासाठी कार्यक्रम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महसूल पंधरवड्यामध्ये १० ऑगस्ट हा दिवस जिल्ह्याधील माजी सैनिक, विधवा, युद्धविधवा, वीरमाता, वीरपिता यांच्या महसूलविषयक अडीअडचणी, तक्रारींचे निरसन करण्यासाठी सैनिक हो तुमच्यासाठी हा उपक्रम रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये राबविण्यात येणार आहे.

संबंधितांनी तालुक्याचे तहसीलदार यांच्या कार्यालयात १० ऑगस्टपूर्वी कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष संपर्क साधावा व आपल्या अडीअडचणींचे निरसन करून घ्यावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

# कुणबी समन्वय समिती सल्लागारपदी शिवराम शिंदे



**रोहे : प्रतिनिधी**


कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न रायगड जिल्हा कुणबी समन्वय समितीच्या सल्लागारपदी रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ कुणबी समाज नेते शिवराम शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे समितीचे अध्यक्ष ज्ञानदेव पवार यांनी माणगाव येथे आयोजित बैठकीत शिंदे यांना दिले.

या बैठकीस ओबीसी जनमोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष सुरेश मगर, कुणबी समाजोन्नती संघ मुंबई संलग्न रायगड जिल्हा कुणबी समन्वय समिती उपाध्यक्ष शंकर भगत, सुभाष लाले, रत्नाकर लांबाडे, दत्ताराम झोलगे, माणगाव तालुकाध्यक्ष सुभाष भोनकर, तळा कुणबी समाज नेते रविशेठ मांडावकर, ओबीसी जनमोर्चा तळा तालुकाध्यक्ष सचिन कदम, रमेश नवले आदी उपस्थित होते.

शिवराम शिंदे यांनी कुणबी समाजाचे रोहा तालुकाध्यक्ष म्हणून नेतृत्व केले आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली स्व. पारा सानप कुणबी सभागृह उभारण्यात आले आहे.

कुणबी समाजाच्या उन्नतीसाठी ते सातत्याने काम करीत असतात. निवडीबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# कर्जतच्या कृषी केंद्राकडून भाताची तीन वाणं विकसित




**कर्जत : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र कर्जतचे भात विशेषज्ञ डॉ. भरत वाघमोडे व त्यांच्या चमूने अथक प्रयत्नातून विकसित केलेल्या कोकण संजय, कर्जत–१० आणि ट्रॉम्बे कोकण खारा या तीन विविध कालावधीच्या वैशिष्ट्यपूर्ण वाणांना राज्यस्तरीय वाण प्रसारण समितीने मान्यता दिली. त्यानंतर केंद्रीय वाण प्रसारण समितीनेही ही नवी वाणं अधिघोषित केल्याने विद्यापीठात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

कोकणातील तसेच राज्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांसाठी विविध गुण वैशिष्ट्ये असणाऱ्या या तिन्ही भात वाणांचे बियाणे पुढील हंगामापासून उपलब्ध करून देण्यात येतील, असे डॉ. भरत वाघमोडे यांनी सांगितले, तर ही तिन्ही वाण भात पिकविणाऱ्या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरतील, असे मत विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ रवींद्र मर्दाने यांनी व्यक्त केले आहे.

**नवीन वाणांची गुणवैशिष्ट्ये**

**कोकण संजय** : हे वाण निमगरवा (१२५ ते १३० दिवस), लांबट बारीक दाण्याचा आणि ५० ते ५५ क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन देणारे आहे. प्रमुख कीड व रोगास मध्यम प्रतिकारक आहे. शिजवल्यानंतर तांदळाची गुणवत्ता उत्तम असून हे वाण राज्यातील भात पिकविणाऱ्या विभागासाठी शिफारस करण्यात आला आहे.

**कर्जत–१०** : हे वाण गरवा (१४० ते १४५ दिवस), ४५ ते ५५ क्विंटल प्रती हेक्टरी उत्पादन देणारे आहे. पाणथळ जमिनीसाठी ते शिफारस करण्यात आले आहे. प्रमुख कीड व रोगास मध्यम प्रतिकारक आहे. अख्ख्या तांदळाचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त असून शिजवल्यानंतर भाताची गुणवत्ता उत्तम आहे.

**ट्रॉम्बे कोकण खारा** : हे वाण निमगरवा (१२५ ते १३० दिवस), लांबट बारीक दाण्याच्या प्रकारातील असून ४० ते ४५ क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन देणारे आहे. कोकण विभागातील क्षारपड जमिनीसाठी याची शिफारस करण्यात आली असून ६ ईसीपर्यंत क्षार सहन करणारे हे वाण आहे.

## मोरे महाविद्यालयाचे युवा महोत्सवात यश

**रोहे : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या ५७व्या युवा महोत्सवाच्या रायगड जिल्हा विभागीय स्पर्धा नुकत्याच श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालय गोवे, कोलाड येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. मोरे महिला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी यात यश मिळवले.

मुंबई विद्यापीठाचे सांस्कृतिक समन्वयक निलेश सावे, प्रसिद्ध कलाकार शुभम खरिवले व अस्मिता सुर्वे आदी मान्यवरांच्या आणि परीक्षकांच्या उपस्थितीत स्पर्धा पार पडल्या. यात मोरे महाविद्यालयातील विद्यार्थिनी नेहा विजय गुप्ता हिने पोस्टर मेकिंगमध्ये द्वितीय क्रमांक, तर सादिया सय्यद जोगिलकरने मेहेंदी स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. ऋतुजा कांबळे व सहकारी प्रा. दर्शना शिंदे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

# पाटणेश्वर अर्बन बँकेच्या अध्यक्ष प्रतिभा पाटील यांचा वाढदिवस साजरा

**पेण : प्रतिनिधी**

पाटणेश्वर बँकेच्या अध्यक्ष प्रतिभा प्रशांत पाटील यांचा वाढदिवसानिमित्त संचालक मंडळाने त्यांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ देऊन साजरा केला व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी प्रास्ताविकात बँकेचे व्यवस्थापक बाळ गणेश उके यांनी बँकेच्या उज्वल भविष्याचा आलेख सादर केला. बँकेचे संस्थापक आमदार रविशेठ पाटील यांनी तरुण उद्योजक व गरजू लोकांना कर्जाच्या माध्यमातून व्यवसायात आणले. बँक स्वतःच्या पायावर उभी असून यात त्यांचे योगदान मोठे आहे, असे उके यांनी सांगितले.

संचालक ह.भ.प. कृष्णा वर्तक यांनी, अल्पवयातच अध्यक्षपदाची धुरा प्रतिभा पाटील यांनी हाती घेतली असून भविष्यात एक आदर्श बँक म्हणून या रायगडच्या पटलावर आणण्याचे काम आपल्या हातून होवो अशा शुभेच्छा दिल्या.

या वेळी बँकेच्या माजी अध्यक्ष कौसल्याताई पाटील, प्रशांत पाटील, उपाध्यक्ष शिवाजी चव्हाण, प्रकाश रामाणे, कृष्णा वर्तक, रोहन सोनावणे, रवींद्र म्हात्रे, बँकेचे व्यवस्थापक बाळ उके आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

सौ. प्रतिभा पाटील यांनी आपल्या मनोगतात बँकेचे संस्थापक तथा आमदार रविशेठ पाटील यांचे आभार मानून बँक उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करत आहे. तरुण उद्योजक पुढे आले पाहिजेत व तळागाळातील माणसांचे बँकेच्या माध्यमातून जीवनमान उंचावले पाहिजे यासाठी प्रयत्न करेन, असे सांगितले.



# लक्ष्य सेनची सेमीफायनलमध्ये धडक

## ऑलिम्पिकमध्ये अशी कामगिरी करणारा पहिला भारतीय पुरुष खेळाडू

**पॅरिस : वृत्तसंस्था**




पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचा बॅडमिंटनपटू लक्ष्य सेनने जबरदस्त कामगिरी केली आहे. बॅडमिंटनच्या उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्यचा सामना चायनीज तैपेईच्या चौ तिएन चेनशी सामना झाला आणि या सामन्यात त्याने चेनचा पराभव करत उपांत्य फेरीत धडक मारली. विशेष म्हणजे लक्ष्यने पहिला सेट गमावल्यानंतर १९-२१, २१-१५, २१-१२ असा विजय मिळवला.

भारताचा तरूण बॅडमिंटनपटू लक्ष्य सेन ऑलिम्पिकमधील बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहचणारा पहिला भारतीय पुरुष बॅडमिंटन खेळाडू ठरला आहे. तिसऱ्या सेटमध्ये लक्ष्य आणि चाऊ तिएन चेन यांच्यात चुरशीची लढत झाली. या सामन्याच्या सुरुवातीला लक्ष्यने आघाडी घेतली होती, मात्र त्यानंतर चाऊ तियान चेनने पुनरागमन करत काही महत्त्वाचे गुण मिळवले. शेवटी लक्ष्यने आपला संयम राखला आणि सेट तसेच सामनाही जिंकला.

या सामन्यात दोन्ही खेळाडूंमध्ये चुरशीची स्पर्धा पाहायला मिळाली. दोन्ही स्टार्स एकेका गुणासाठी संघर्ष करताना दिसले. पहिल्या सेटमध्ये चायनीज तैपेईच्या चाऊ तिएन चेनने लक्ष्याला गुण मिळवण्याची एकही संधी दिली नाही आणि सेट २१-१९ असा जिंकला. त्यानंतर लक्ष्यने दुसऱ्या सेटमध्ये पुनरागमन करत २१-१५ असा विजय मिळवत सामना बरोबरीत आणला, तर तिसऱ्या सेटमध्ये शानदार विजय मिळवत लक्ष्यने सामना आपल्या नावे केला.

भारताची ऑलिम्पिक विजेती बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधूला उपांत्यपूर्व फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले होते. देशाला तिच्याकडून पदकाच्या सर्वाधिक अपेक्षा होत्या. यानंतर पुरुष दुहेरीतही सात्विक-चिराग जोडीला पराभवाला सामोरे जावे लागले. लक्ष्यने उपांत्यपूर्व फेरीत एचएस प्रणॉयचा पराभव केला होता. यामुळे तो आता बॅडमिंटनमधील पदकासाठी भारताची शेवटची आशा आहे.

## भारतीय हॉकी संघाचा आज ग्रेट ब्रिटनसोबत सामना

**पॅरिस** : भारतीय संघाचा फॉर्म पाहता सुवर्णपदकाच्या आशा जिवंत आहेत. कर्णधार हरमनप्रीत सिंगनेही सुवर्णपदक जिंकू, असा विश्वास व्यक्त केला. भारताचा पुढील सामना रविवारी (दि. ४) ग्रेट ब्रिटनसोबत होणार आहे.

हॉकीच्या उपांत्यपूर्व फेरीत ४ ऑगस्ट रोजी जर्मनी विरुद्ध अर्जेंटिना, भारत विरुद्ध ग्रेट ब्रिटन, नेदरलँड्स विरुद्ध ऑस्ट्रेलिया आणि बेल्जियम विरुद्ध स्पेन असे सामने होणार आहेत. इथे भारतीय संघ ग्रेट ब्रिटनचा पराभव करण्यात यशस्वी झाला, तर उपांत्य फेरीचे तिकीट मिळेल. भारताने उपांत्य फेरी गाठल्यास उपांत्य फेरीत त्यांचा सामना जर्मनी किंवा अर्जेंटिनाशी होऊ शकतो.











5 Aug

**आमदार मा. श्री. प्रशांत ठाकूर**
यांना वाढदिवसाच्या **हार्दिक शुभेच्छा!**

### लाईफ लाईन वंध्यत्व उपचार व टेस्ट ट्युब बेबी सेंटर

**वंध्यत्वाची व्याख्या**

लग्नानंतर एखादे जोडपे सहा महिने ते वर्षभर सोबत राहून व शारीरिक संबंध ठेवून देखील गर्भधारणा होत नसेल तर अशा जोडप्याला वंध्यत्व जोडपे असे म्हणू शकतात व अशा जोडप्याने स्त्री व पुरूषाच्या दोघांच्या तपासण्या करणे आवश्यक आहे.

**पुरूषांमधील वंध्यत्वाची कारणे**

* स्त्री-पुरुष शारीरिक संबंध प्रस्थापित न करू शकतो. (Sexual dysfunction)
* शुक्रजंतूचे प्रमाण (संख्या) कमी असणे (Oligo Spermia) शुक्रजंतूमध्ये हालचाली शिथीलता असणे (Azthenospermia) शुक्रजंतू शुन्य संख्या असणे (Azoospermia) व्यंग असलेले शुक्रजंतू (Teratospermia)
* लहानपणी टी.बी., गालगुंड, देवी, कांजण्या तसेच मोठेपणी भार लागणे, हायड्रोसील/हर्नीया ऑपरेशन होणे, गुप्तरोगाची लागण होणे (S.T.D.)

**स्त्रियांमधील वंध्यत्वाची कारणे**

* जन्मतः गर्भपिशवी/अंडकोश (Ovaries) लहान असणे/तयार न होणे (Hypoplastic Uterus & Ovaries) ज्यामुळे पाळीची सुरूवात होत नाही.
* गर्भपिशवी मधील दोष :- गर्भाशयामध्ये गाठी असणे/गर्भाशयामध्ये पडदा असणे/दोन गर्भाशय असणे (Biconuate Uterus)
* गर्भनलिकेमधील दोष :- जंतुसंसर्गामुळे गर्भनलिका बंद होणे, मुख्यतः टी.बी.मुळे, गर्भनलिकांमध्ये पाणी होणे (Hydrosalpinx)
* अंडकोशांमधील दोष :- जन्मतः अंडकोश लहान असणे. अंडकोशात स्त्री बीज तयार न होणे. स्त्री बीज बाहेर फुटण्याची क्रिया न होणे (Unovulation)/PCOD

**वंध्यत्वावरील आधुनिक तपासण्या**

**स्त्रियांमधील तपासण्या :-**

* हार्मोनच्या रक्ततपासण्या / व इतर रक्त तपासण्या
* सोनोग्राफी (Tranvaginal)
* (Follicular Studies) (स्त्री बीज वाढण्याची क्रिया सोनोग्राफीने तपासणी)
* व्हिडीओ दुर्बिणीने गर्भपिशवी व गर्भाशयाची पोकळी तपासणी (Videolaparohysteroscopy) व गर्भनलिका तपासणे. (Tubal patency by methelene blue Test)

**पुरूषांमधील तपासण्या :-**

* रक्त तपासण्या
* विर्य तपासणी

**वंध्यत्वावरील अत्याधुनिक उपचार**

दोषांचे प्रमाण :-
स्त्री मधील दोष ३० ते ४०% असतात. पुरूषांमध्ये दोष ४० ते ५०% आढळतात व १०% जोडप्यांमध्ये काहीही दोष आढळत नाहीत. (Hydrosalpinx)

**उपचार पध्दती :-**

* Sperm Wash & IUI (स्पर्म वॉश व आय.यु.आय.)
* IVF & ET (आय.व्ही.एफ.)
* ICSI & ET (इक्सी)
* LASER (L.A.H.) लेझर असीस्टेड हॅचींग
* Blastocyst
* Cumulus Co-culture
* EGG DONATION / RECIPIENT PROGRAMME (स्त्री बीज / गर्भ दत्तक घेणे)
* आय.यु.आय. :- (SPERM WASH & I.U.I.)

स्त्रीला पाळीच्या दुसऱ्या दिवसापासून गोळ्या व इंन्जेक्शन देऊन स्त्री बीजांची वाढ केली जाते व दहाव्या दिवसापासून सोनोग्राफीने बीजांची बीजांची संख्या व आकार (18 mm) स्त्री बीजे पूर्णपणे तयार झाल्यावर (18 mm) ती बाहेर पडण्यासाठी (Ovulation) इन्जेक्शन दिले जाते व येणाऱ्या २४ ते ३६ तासात पुरूषाचे वीर्य घेऊन त्यावर लॅबमध्ये प्रक्रिया करून (Sperm Wash) जीवंत शुक्रजंतु वेगळे काढून त्याची हालचाल (Motility) वाढवून ते शुक्रजंतू गर्भाशयात सोडले जातात. या उपचार



पध्दती मध्ये १०% यशाची शक्यता असते, त्याकरीता ही उपचार पध्दती (Sperm Wash IUI) कमीत कमी तीन ते पाच महिने सलग करावी.

**IVF-ET /ICSI-ET (टेस्ट ट्युब उपचार पध्दती)**

वंध्यत्व उपचारामधील शेवटची उपचार पध्दती असून उपचारपध्दती जेव्हा सर्व उपचार करून देखील अपत्यप्राप्ती होत नाही तेव्हा टेस्ट ट्युब उपचार करण्याचा सल्ला दिला जातो.

ह्या उपचार पध्दतीत स्त्रीला हार्मोनची इन्जेक्शन १० ते १५ दिवस दिली जातात व स्त्री बीज तयार केली जातात. १२ व्या दिवसा नंतर स्त्रीबीजे सोनोग्राफी मशिनच्या सहाय्याने बाहेर काढली जातात व ती स्त्रीबीजे पुरूषाचे शुक्रजंतु घेऊन एका स्त्रीबीजात एक शुक्रजंतू काचेच्या अतिसुक्ष्म सुईने सोडला जातो व स्त्रीबीज फलीत करून ते फलीत झालेले स्त्रीबीज पोषक वातावरणात इन्क्युलेटर मध्ये वाढविले जातात व पूर्ण गर्भ चार ते आठ पेशींचा गर्भ तयार झाल्यावर गर्भ एका कॅथेटरच्या सहाय्याने गर्भाशयाच्या पोकळीत सोडले जातात व गर्भ रूजण्यासाठी व वाढण्यासाठी औषधे देऊन पेशंटला घरी पाठविले जाते. १५ दिवसानंतर रक्त तपासल्यावर स्त्रीला गर्भधारणा झाली आहे किंवा नाही ह्याचे निदान होते. ह्या उपचार पध्दतीमध्ये यशाची शक्यता ४० ते ५०% असते.

**TESA PESA & ICSI :**

टेसा पेसा ही पध्दत ज्या पुरूषांमध्ये शुक्रजंतू बिजांडामध्ये तयार होतात परंतु विर्यामध्ये उत्सर्जीत होत नाहीत अशा पुरूषांमध्ये इन्जेक्शनद्वारे शुक्रजंतू काढले जातात व ते शुक्रजंतु ICSI साठी स्त्रीबीज फलित करण्यासाठी वापरले जातात.

**टेस्ट ट्युब उपचार पध्दती - समज - गैरसमज :**

* टेस्ट ट्युब बेबी पासून होणाऱ्या मुलामध्ये व्यंग असण्याचे प्रमाण सर्वसाधारण प्रमाणा एवढेच असते.
* टेस्ट ट्युब बेबी पासून होणाऱ्या मुलामध्ये बौध्दीक क्षमता सर्वसाधारण मुला एवढीच असते.
* होणारे मुल हे पूर्णपणे उपचार घेणाऱ्या स्त्री व पुरूषाचेच असते.
* Success Rate यशाची खात्री ही फक्त ४० ते ५०% एवढीच असते.
* ह्या उपचार पध्दती दरम्यान व नंतर देखील स्त्रीला पुर्णतः आरामाची बिलकुल गरज नसते. ती घरातील रोजची कामे सुरळीतपणे करू शकते.
* ह्या उपचार पध्दतीमध्ये फक्त मुलीच होतात असे नाही, मुलगे सुध्दा होतात.
* जुळ्यांचे प्रमाण थोड्या प्रमाणात जास्त असू शकते.
* जेवढे स्त्रीचे वय कमी तेवढे यशाचे प्रमाण जास्त असते.
* रक्त गटाचा व मुल होण्याचा काहीही संबंध नसतो.

**Economy IVF (अल्प दरातील टेस्ट ट्युब उपचार)**

EGG/EMBRYO SHARING PROGRAMME : दोन स्त्रीयांमध्ये एक कमी वयाची व दुसरी वयस्क स्त्री या दोघींमध्ये स्त्रीबीजे विभागून ती स्त्रीबीजे त्यांच्या त्यांच्या पुरूषांचे शुक्राणू वापरून फलित केली जातात व तयार होणारे गर्भ ज्या त्या स्त्रीच्या गर्भाशयात सोडले जातात. त्यामुळे नेहमी पेक्षा खर्च कमी होतो.

**लेसर असीस्टेड हॅचींग (LASER ASSISTED HATCHING)**

स्त्रीचे वय ३५ पेक्षा जास्त असल्यास किंवा पहिले IVF टेस्ट ट्युब बेबी उपचार अपयशी झाल्यास अशा स्त्रीयांमध्ये गर्भ गर्भाशयामध्ये सोडण्याच्या आधी गर्भाच्या बाह्य आवरणाला (ZONA) लेसरच्या सहाय्याने छेद दिला जातो व गर्भ गर्भाशयात सोडले जातात. ह्या लेसर उपचारामुळे गर्भ रूजण्याची व यश मिळण्याची शक्यता १०% ने वाढते.



**अधिक माहितीसाठी संपर्क :**

**डॉ. प्रकाश पाटील,**
Consultant Gynaecologist & Obstetrician
Infertility & IVF Specialist Laparoscopic Surgeon,
MS (Ob/Gy), DGO (Ireland)
**M: 9769112233**

**डॉ. केतकी म्हस्के (पाटील),**
Consultant Gynaecologist & Obstetrician
Infertility & IVF Specialist, Endoscopic
Surgeon, Advanced Hysteroscopic Surgery(France)
**M: 9323470607**

ADVT.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com